

## विधीमंडळ अधिवेशन

### महायुतीचे मनपा निवडणुकीत पानिपत होणार : नाना पटोले



**नागपूर :** मनपा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीमध्ये मनसेला घ्यायचे की नाही याबद्दल आमची चर्चा झालेली नाही. मनपाच्या निवडणूक अजून जाहीर झालेली नाही. पण महायुतीने एवढ्या लोकांना प्रवेश दिला आहे आता त्यांच्यातील किती लोकांना सांभाळतात हे बघावे लागेल. महायुतीने एकत्र निवडणूक लढवली तरी त्यांचा फटका मविआला बसणार नाही. कारण जनतेमध्ये महायुतीच्याविरोधात राग आहे, या निवडणुकीत त्यांचे पानिपत होणार आहे, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे. नाना पटोले म्हणाले की, महायुतीचे लोक कितीही एकत्र झाले तरी चोर-चोर मौसेरे भाऊ असतात. हे तिघे मिळून ज्या पद्धतीने राज्य लुटत आहे. आणि एकमेकांना वाचवत आहेत. लुटीनंतर आता जनतेमध्ये रोष आहे. जनतेची तिजोरी लुटून त्यांचा फायदा मुठभर लोकांना आणि राज्यकर्त्यांना कसा होतो हे लोकांना कळतंय. नाना पटोले म्हणाले की, शेतकऱ्यांच्या दैनंदिन आयुष्यात वाढत्या आर्थिक ताणामुळे चिंतेची परिस्थिती निर्माण झाली असून, पटोले यांनी आत्महत्येच्या प्रश्नालाही अधिवेशनात अधोरेखित केले. दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत आहेत, ही बाब केवळ लाजीरवाणी नव्हे, तर राज्याच्या कृषी धोरणातील गंभीर अपयशाचे द्योतक आहे, असे ते म्हणाले.

## मुंबईतील बाबुलनाथ मंदिराच्या जागेचा प्रश्न मार्गी

# अवघ्या १ रुपयांत भाडेपट्टा नूतनीकरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

मुंबईतील गिरगाव जवळील प्रसिद्ध बाबुलनाथ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या जागेचा (भाडेपट्टा) प्रश्न राज्य सरकारने निकाली काढला आहे. या जागेचा भाडेपट्टा आता 'बाबुलनाथ चॅरिटी ट्रस्ट'ला अवघ्या 1 रुपया या नाममात्र दराने 30 वर्षांसाठी नूतनीकरण करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात निवेदनाद्वारे ही माहिती दिली.

मलबार-कंबाला हिल महसूल विभागातील 'भुकर क्रमांक 435 पार्ट' या मिळकतीचा हा विषय होता. या निर्णयानुसार, एकूण 718.23 चौ.मी. क्षेत्रफळापैकी 135 चौ.मी. क्षेत्राचा वापर हा 'वाणिज्यिक' कारणांसाठी होत असल्याने ते क्षेत्र वगळण्यात आले आहे. उर्वरित 583.23 चौ.मी. जागेचा वापर हा केवळ बाबुलनाथ मंदिराकडे जाणाऱ्या मार्गिकेसाठी (पायऱ्या व रस्ता) होत असल्याने, या जागेचा भाडेपट्टा नूतनीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



बाबुलनाथ मंदिर हे मुंबईतील अतिशय प्राचीन आणि जागृत शिवमंदिर आहे. श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या आणि मार्गिकेची जागा ही शासकीय जमिनीवर (लीझवर) होती. या लीझचे नूतनीकरण वेळेवर न झाल्याने काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच, मलबार हिलसारख्या उच्चभ्रू आणि महागड्या परिसरात ही जागा असल्याने, त्याचा बाजारभावानुसार कर भरणे चॅरिटी ट्रस्टला अवघड होऊ शकले असते. या जागेच्या भाडेपट्ट्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. शासनाने आता यावर कायमस्वरूपी तोडगा काढला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितले की, मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी आणि ट्रस्टच्या कायार्चा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे अधिकृत आदेश तातडीने निर्गमित करण्यात येत आहेत. शासनाने यात वाणिज्यिक वापर वेगळा काढून, केवळ धार्मिक आणि सार्वजनिक वापराच्या जागेसाठी 1 रुपया नाममात्र दर आकारल्याने ट्रस्टला मोठा दिलासा मिळाला आहे. तर विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्यांनी महसूलमंत्र्यांचे अभिनंदन करत भक्तांच्या मागणीचा विचार केल्याबद्दल आभारही मानले.

#### असा झाला निर्णय

**मानीव नूतनीकरण :** दिनांक ३०.०४.१९९२ पासून मानीव नूतनीकरण ग्राह्य धरण्यात आले आहे.

**पुढील कालावधी :** दिनांक ०१.०१.२०१२ पासून पुढील ३० वर्षांच्या कालावधीसाठी हे नूतनीकरण लागू असेल.

**दर :** यासाठी शासनाने केवळ १ रुपया इतका नाममात्र वार्षिक दर आकारून 'बाबुलनाथ चॅरिटी ट्रस्ट'च्या नावे भाडेपट्टा करार करण्यास मंजुरी दिली आहे.

### कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :



राज्यात तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मधील २४६ वरून २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत खाली आले आहे. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील असून महिला व बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांची टीम तयार करण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात सांगितले.

सदस्य उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला. मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण २०२४ मधील ०.७९ टक्क्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये ०.४१ इतके कमी झाले आहे. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये देखील कुपोषण मुक्तीला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

### एफडीएच्या कारभारावर सत्ताधारी आमदारांचीच नाराजी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यपद्धतीवर खुद्द सत्ताधारी भाजपच्या आमदारांनीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हिवाळी अधिवेशनात बोलताना भाजप आमदार विक्रमसिंह पाचपुते आणि ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी एफडीएच्या ढिसाळ कारभाराचे वाभाडे काढले. "अधिवेशन आले की एफडीएला जाग येते आणि कारवाया सुरू होतात, एरवी हा विभाग सुस्त असतो," अशा शब्दांत पाचपुते यांनी विभागाचे कान टोचले. विशेष म्हणजे, मंत्री नरहरी झिरवळ हे देखील हतबल झाल्याचे पाहायला मिळाले.

सभागृहात बोलताना आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी प्रशासनाला धारेवर धरले. ते म्हणाले, "मागील अधिवेशनात मी फेक पनीर आणि नालॉग चीजचा मुद्दा मांडला होता, तेव्हा एफएसएसएआयने याची गंभीर दखल घेतली होती. मात्र, एफडीएचे अधिकारी केवळ अधिवेशन सुरू असतानाच कारवाया दाखवतात. यंदाच्या अधिवेशनात या विभागाचा प्रश्न नव्हता, त्यामुळे कारवाईही शून्य आहे."

कफ सिरपमुळे नुकतेच 25 मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा दाखला देत पाचपुते यांनी महाराष्ट्रात अशी परिस्थिती उद्भवू नये, यासाठी वेळीच सावध राहण्याचा इशारा दिला. तसेच निधीच्या कमतरतेवर बोट ठेवले. "उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या विभागासाठी 200 कोटींची घोषणा केली होती, पण प्रत्यक्षात हातात केवळ 30 कोटी पडले. निधीशिवाय सुधारणा कशी होणार?" असा सवालही विक्रमसिंह पाचपुते यांनी सभागृहात उपस्थित केला. सुधीर मुनगंटीवार यांनीही विभागाच्या प्रशासकीय अनागोंदीवर टीका केली. "शासन गंभीर नाही, शब्द देऊनही पैसे दिले जात नाहीत. बिंदू नामावलीमध्ये सुधारणा करण्यासाठी एकही पाऊल उचलले नाही.

### पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यात उमेद मॉल उभारले जाणार : जयकुमार गोरे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :



महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बारमाही बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल संकल्पना सुरू झाली असून पहिल्या टप्प्यात 10 जिल्ह्यात उमेद मॉल उभारले जाईल. पुढील टप्प्यात तालुका स्तरावरही मॉल सुरू करण्याचा विचार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

विधानसभेत सदस्य संतोष बांगर, सुधीर मुनगंटीवार, नमिता मुंदडा , बाबासाहेब देशमुख, नानाभाऊ पटोले, देवराव भोंगळे, किशोर पाटील, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उमेद अभियानातील महिला बचत गट, समुदाय संसाधन व्यक्ती आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्यांवर प्रश्न उपस्थित केले. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले की, राज्यातील उमेद अभियान बंद होणार नाही. उमेद अभियानात कार्यरत असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींना ग्रामसखी हे पदनाम देण्याची मागणी मान्य करण्यात आली असून शासन निर्णय आजच जारी होणार आहे.

### एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन करणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या ( एनएचएम) अंतर्गत कार्यरत असलेल्या सुमारे १० हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करण्यात येणार असून त्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना आबिटकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी सरकारने कालबद्ध कार्यक्रम आखला असून त्यासाठी सेवाप्रवेश नियमातून वगळण्यात आल्याचे सांगितले. मात्र ही अडचण आता दूर झाली असून कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याला वेळेवर मानधन मिळणार असल्याचे आबिटकर यांनी अन्य एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

### राज्यात मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञानवारी योजनेमध्ये नियोजन विभागाचा खोडा



**नागपूर :** राज्यात मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञानवारी योजना तसेच मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. या योजनेत नियोजन विभागाने काही आक्षेप घेतले आहे. ते दूर करून तसेच मंत्रिमंडळात याची मान्यता घेऊन योजना लवकरच सुरू करण्यात येईल, अशी माहिती शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी तारांकित प्रश्नावरील चर्चेत दिली. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्याचीही अंमलबजावणी करण्यात येईल, असे सांगितले. अमित साटम यांनी अंमलबजावणीला सहा महिने उशीर का लावला? असे विचारले. देवयानी फरांदे यांनीही यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. दादा भुसे यांनी पूर्वी या योजनेचा १ लाख ६ हजार खर्च होत होता. आता १२ लाख ९६ हजार रुपये खर्च होणार आहे. यामुळे कदाचित विद्यार्थी बाहेरून उपकरणे करून आणतील, ५१ हजार रुपयांना लॉजिक काय लावले, असे आक्षेप नियोजन विभागाने घेतले आहेत. दरम्यान, या वेळी राज्यातील इतर शैक्षणिक मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञानवारी योजनेंतर्गत निवड झालेल्या तालुका स्तरावरील २१ विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे व मुंबई यापैकी एका विज्ञान केंद्राला, जिल्हा स्तरावरील ५१ विद्यार्थ्यांना इस्त्रोला आणि राज्य स्तरावरील ५१ विद्यार्थ्यांना अमेरिका येथील नासा सेंटरला भेट घडवली जाणार आहे. नमिता मुंदडा, नाना पटोले, योगेश सागर, वरुण सरदेसाई यांनीही प्रश्न विचारले.

### विधानभवन परिसरात स्वतंत्र विदर्भ राज्याचे नारे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

नागपुरातील हिवाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानभवन परिसरात चक्क पत्रकाराकडूनच स्वतंत्र विदर्भ राज्याचे नारे दिले गेले. त्यानंतर सुरक्षा यंत्रणेकडून त्यांना ताब्यात घेतले गेले. यादरम्यान पत्रकाराकडून महाराष्ट्र दिवाळखोर असल्याचे सांगत काय आरोप केले? त्याबाबत आपण जाणून घेऊ या. नागपुरातील हिवाळी अधिवेशनाचे काम शुक्रवारी सुरू होते. दुपारी ज्येष्ठ पत्रकार व विदर्भवादी नेते प्रकाश पोहरे विधीमंडळ परिसरात आले. त्यांनी विधान सभेच्या पायरीजवळ आल्यावर अचानक स्वतंत्र विदर्भ राज्य झालेच पाहिले, असे नारे देणे सुरू केले.

### संसदीय लोकशाहीत पक्ष संघटनेचे योगदान देखील महत्वाचे : चंद्रकांत पाटील



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

संसदीय लोकशाहीत विविध पक्षांच्या संघटनेचे योगदान देखील महत्वाचे असते. विविध पक्ष आपल्या विचारधारेप्रमाणे लोककल्याणाचे विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत असतात. सामान्य नागरीकांचे प्रश्न, समस्या, त्यांचे दुःख मांडण्याचे काम पक्षीय संघटना करते. लोकशाहीत पक्षीय संघटना आणि पक्षातील अंतर्गत लोकशाही देखील तितकीच महत्वाची ठरते, असे संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

विधानभवन येथे 51 व्या संसदीय अभ्यासवर्गात संसदीय लोकशाहीत पक्ष संघटनेचे महत्व, योगदान व जबाबदारी आणि लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर मार्गदर्शन करतांना पाटील बोलत होते. यावेळी विधानमंडळाच्या सचिव मेघना तळेकर, विधानभवनचे जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने उपस्थित होते. सुरुवातीस तळेकर यांनी मंत्री पाटील यांचे स्वागत केले.

संसदीय लोकशाहीत सर्वात खालच्या पातळीवरची आणि गावांचा कारभार पाहणारी संस्था म्हणून ग्रामपंचायत काम करते. केवळ या संस्थेच्या निवडणूका पक्ष विरहीत असतात. त्यानंतर सर्व संस्थांच्या निवडणूका विविध पक्षांच्यावतीने लढविल्या जातात. निवडणूका लढतांना पक्षांच्यावतीने आपआपली विचारधारा लोकांपुढे ठेवली जाते. पक्ष संघटनेद्वारे आपले पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यामार्फत अधिकाधिक नागरिकांपर्यत विचारधारा पोहोचवून त्याद्वारे नागरिकांचे सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न होत असतो, असे पुढे बोलतांनी मंत्री पाटील म्हणाले.

प्रत्येक पक्षाची विचारधारा, व्हिजन वेगवेगळे असू शकते. त्या विचारधारेवर आधारीत कार्यकर्ते तयार होत असतात. मी भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणून काम करतो. आमच्या पक्ष संघटनेत प्रत्येक घराचे देखील नियोजन केले जाते. पक्ष संघटना वाढविण्यासाठी असे नियोजन फार महत्वाचे ठरतात.

भारतीय राज्यघटनेने आपल्याला लोकशाही दिली. देशात लोकशाही पद्धतीने राज्य चालते. अशी लोकशाही पक्ष संघटनेत देखील असणे आवश्यक आहे. कोणतीही एक व्यक्ती अनेक काळ पक्ष पदाधिकारी असू नये, दर तीन वर्षांनी पक्ष संघटनेत बदल व्हावे, असे बदल पक्षीय लोकशाहीला बळकट करतात. पक्षीय लोकशाहीत मजबूत विचारधारा पक्षाला मजबूत करत असते, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.

# एनएसयूआयचे कार्यकर्ते संतप्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांनी तरुणांना रोजगार देण्याचे गाजर दाखवून मते मिळवली. परंतु सत्तेवर आल्यावर प्रत्यक्षात तरुणांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे शुक्रवारी नागपुरातील विधान भवनावर नॅशनल स्टुडेन्ट्स युनियन ऑफ इंडियाने मोर्चा काढला. मोर्चा पोलिसांनी अडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कार्यकर्ते संतापले. त्यांनी पोलिसांच्या कठड्यावर चढत विधान भवनाकडे जाण्याचा प्रयत्न केला. यामुळे येथे तणाव निर्माण झाला होता.




विद्यार्थ्यांचे प्रश्न विचारण्यासाठी अन सरकारला जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश एनएयूआयकडून शुक्रवारी इंदोर मैदानातून विधानभवनावर जाण्यासाठी संघर्ष मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मोर्चा एलआयसी चौकाकडे आला. येथे पोलिसांनी मोर्चाला अडवले. त्यावर एनएसयूआयचे कार्यकर्ते संतापले. परंतु पोलीस जाऊ देत नसल्याचे कार्यकर्ते थेट पोलिसांनी लावलेल्या कठड्यांवर चढून पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागले. त्यात कठड्यांची पोलिसांसोबत ढकला- ढकलीही झाली. त्यामुळे येथे तणाव निर्माण झाला होता. परंतु पोलिसांनी बंदोबस्त वाढवून अनुचित प्रकार टाळला. याप्रसंगी आंदोलकांनी सरकार आम्हाला घाबरत असून विधान भवनात येऊ देत नसल्याचाही आरोप केला.

तरुणांना रोजगार देऊन बेरोजगारी दूर होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार असल्याचे सांगितले. आंदोलनात एनएयूआयचे राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र प्रभारी अक्षय यादव, राष्ट्रीय सचिव सचिव व महाराष्ट्र प्रभारी कांता ग्वाला, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सागर साळूंखे उपस्थित होते. दरम्यान तातडीने शासनाने मागणी मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी दिला.

### नेत्रम ॲप डेटाच्या तपासणीनंतर कारवाई : डॉ.उदय सामंत



**नागपूर:** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेले नेत्रम ॲपमध्ये नोंदवलेला डेटा महानगरपालिका प्रशासनाने तपासण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात येतील. संबंधित क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे, हे या डेटाद्वारे समोर येईल आणि त्यानंतर गरजेनुसार पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती मंत्री डॉ.उदय सामंत यांनी दिली. विधानसभा सदस्य मिहिर कोटेचा, कॅप्टन आर. सेल्वन, मनिषा चौधरी या सदस्यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री डॉ.सामंत म्हणाले की, सर्वेक्षणासाठी महानगरपालिका, पोलीस आणि एसआरएच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक तयार करण्यात येणार आहे. या पथकाद्वारे संबंधित भागातील प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्यात येईल. कांदळवनातील नियमभंगाच्या मुद्यावरही मंत्री डॉ.सामंत यांनी शासनाची भूमिका व्यक्त करीत केंद्र आणि राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत कटिबद्ध : पंकज भोयर



**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत योग्य गौरवाने प्रसार व्हावा, याबाबत राज्य सरकार कटिबद्ध असून यासाठी पाठपुरावा अधिक वेगाने केला जाणार असल्याचे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत अधार्तास चचेर्ला उत्तर देताना सांगितले. सदस्य सत्यजित तांबे यांनी सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबद्दल अधार्तास चर्चा उपस्थित केली होती. यावेळी सदस्य अमोल मिटकरी, ज.मो.अभ्यंकर यांनी चर्चेत सहभागी झाले होते.

# सर्वसामान्यांना मदतीची भूमिका लोकप्रतिनिधींनी स्वीकारावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन वेळप्रसंगी कायदा व लालफितीत न ता आवश्यकतेनुसार कायदे बदलण्याची तयारी लोकप्रतिनिधींनी ठेवावी यासाठी संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या आयुधांचा वापर करावा, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.




विधानपरिषद सभागृहात राष्ट्रकुल संसदीय मंडळातर्फे लोकप्रतिनिधींची मतदार संघांप्रती असलेली जबाबदारी आणि त्यासाठी सभागृहाच्या माध्यमातून उपलब्ध असलेले संविधानीक व्यासपीठ या विषयावर मार्गदर्शन करताना शिंदे बोलत होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानमंडळाच्या सचिव मेघना तळेकर उपस्थित होत्या.

मतदारसंघातील नागरिकांनी मला निवडून दिले. त्यामुळे मला त्यांच्यासाठीच काम करायचे आहे, ही भावना सतत जोपासण्याची आवश्यकता व्यक्त करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. लोकांच्या आयुष्यातील दुःख कमी करून आनंदाने समाधान देण्यासाठी मिळालेल्या पदाचा पुरेपूर वापर करायला हवा. जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून लोकांचे दुःख कळायला हवे आणि ते सोडविण्यासाठी संविधानाच्या सर्व मार्गांचा अवलंब केल्यास मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांचे जीवन सुसह्य होईल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

लोकशाही हे पवित्र मंदिर आहे आणि सर्वसामान्य जनता हेच माझे दैवत आहे. याच भावनेतून एक चांगला लोकप्रतिनिधी होण्यासाठी चांगला विद्यार्थी होणे गरजेचे आहे. मी आजही स्वःताला विद्यार्थीच समजतो अशी भावना व्यक्त करताना शिंदे म्हणाले की, लोकशाही प्रणाली लोकाभिमुख व्हावी अशी माझी कायम भुमिका आहे. लोकशाही म्हणजे जनता आणि लोकप्रतिनिधी या दोघांमध्ये वाहणारी पवित्र गंगा आहे. ही विकासाची गंगा सदैव प्रवाहित ठेवणे, प्रदूषित होऊ न देणे ही शासनाची आणि प्रशासनाची जबाबदारी असल्याची त्यांनी यावेळी सांगितले.

राज्याच्या संसदीय कार्यप्रणालीतील परंपरा सर्वोच्चाने दिमाखदार असून पक्षीय भेदाकडे जाऊन पीठासीन अधिकाऱ्यांनी लोकशाहीची प्रतिमा जपलेली आहे. यामध्ये ग.वा. मावळणकर, वि.स. पागे, रा.सू. गवई, जयंतराव टिळक, ना.स. फरांदे, मधुकरराव चौधरी, दत्ताजी नलावडे, अरुण गुजराती यांच्यापासून आजपर्यंतच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी जपली आहे. शाखा प्रमुखापासून सुरू झालेल्या राजकीय प्रवासामध्ये सातत्याने कॉमनमॅन आता डेडिकेटेट टू कॉमनमॅन समजत असल्यामुळेच सामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. लोकांच्या आयुष्यातील दुःख कमी करून आनंदाने समाधान आणण्यासाठी मिळालेल्या पदाचा पुरेपूर वापर केल्याने यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

लोकप्रतिनिधींची मतदारसंघाप्रती असलेली जबाबदारी या विषयासंदर्भात बोलताना ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण व गरिबांना बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, जीवनदायी योजनेत पाच लाखापर्यंतचे उपचार तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमतून अडीच वर्षात 80 हजार रुग्णांना सुमारे 450 कोटी रुपयांची मदत केली आहे.

त्यासोबतच शासन आपल्या दारी सारख्या योजनेचा सुमारे 5 कोटी लोकांनी लाभ घेतला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून लोकांच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडत असल्याचे समाधान असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महासागर
शनिवार, दि. 13 डिसेंबर 2025
अमरावती
पान 3

# तारणातील माल विकून बँकेची 3.54 कोटींची फसवणूक

## गोडाऊन भाड्याने घेऊन सोयाबीन-मका-ढेप विक्री; दोघांवर गुन्हा नोंद




### बँकेची परवानगी न घेता माल विक्री

दोन्ही आरोपींनी तारण ठेवलेला स्वत:चा माल, तसेच आपसात संगनमत करून एकमेकांचा तारणातील माल, बँकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता परस्पर विक्री करून टाकला. यामुळे बँकेला मोठे आर्थिक नुकसान झाले. तारणातील माल विक्री केल्यानंतर गौरव मुंधडा याने 92,04,781.22 रुपये व सुमीत भंसालीने 2,62,85,982 रुपये अशी एकूण 3,54,90,763.22 रुपयांनी फसवणूक करण्यात आली. फिर्यादीच्या तक्रारीनुसार आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या अहवालावरून बडनेरा पोलिसांनी आरोपींविरोधात गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 12 )** - तारण म्हणून ठेवलेल्या कृषी मालाची परस्पर विक्री करून तब्बल 3 कोटी 54 लाख 90 हजार 763.22 रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात आर्थिक गुन्हे शाखेच्या पत्रावरून बडनेरा पोलीस स्टेशनमध्ये गंभीर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दिपक बाबाराव बांबल (52, दत्तविहार कॉलनी) यांच्या तक्रारीवरून आरोपी गौरव मुंधडा आणि सुमीत भंसाली यांच्याविरोधात संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गौरव विजयकुमार मुंधडा (52, रा. दत्तविहार कॉलनी, अमरावती) यांनी नेमाणी गोडाऊन, बडनेरा येथे गोडाऊन क्रमांक 1, 8 आणि 11 भाड्याने घेतले होते. येथे त्यांनी सोयाबीन, चणा, मका, ढेप इ. कृषी माल साठवून त्याच्या पावत्या खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. येथे तारण ठेवल्या. 65 लाख कर्ज, 35 लाख व 40 लाख अशा प्रकारे गौरव मुंधडा यांनी एकूण 1.40 कोटींचे कर्ज घेतले. आरोपी सुमीत कांतीलाल भंसाली (37, रा. भाजीबाजार, अमरावती) यांनीदेखील त्याच गोडाऊनमध्ये ठेवलेल्या मालाच्या पावत्या तारण ठेऊन 1,38,56,000 रुपये, 58 लाख व 61,90,000 रुपये याप्रमाणे त्यांनीही मोठ्या रकमेची उचल केली.

## शहरातील विकासकामे करताना भविष्यकालीन उपयुक्ततेला प्राधान्य द्या!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### अमरावती महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा विधानभवनात आढावा



महासागर प्रतिनिधी

**अमरावती/ नागपूर, ( दि.12 )** - 'शहरातील कोणतेही विकासकाम हाती घेताना त्याची उपयोगिता पुढील पिढ्यांसाठीही टिकेल याची खात्री असावी. प्रकल्पांची निवड केवळ आजच्या गरजांसाठी नव्हे, तर शहराच्या भविष्यातील वाढीला लक्षात घेऊन करावी,' असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. अमरावती महानगरपालिकेच्या विविध प्रश्नांबाबत विधानभवनात घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते. सद्यस्थितीत अपूर्ण असलेल्या कामांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तातडीने तरतूद करण्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय आणि सुलभा खोडके, आमदार रवी राणा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, तसेच अनेक विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, अमरावती शहरातील विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. मात्र, योजना ही टिकाऊ, व्यवहार्य आणि शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या अपेक्षांना अनुरूप असणे गरजेचे आहे. शहरातील राजकमल रेल्वे ओव्हरब्रिजची वहनक्षमता संपली असून वाहतुकीची समस्या गंभीर बनली आहे. त्याची सक्षम पुनर्बांधणी करण्यासाठी महारेलकडून तांत्रिक सल्ला घेण्याचे त्यांनी सांगितले.

अमृत योजनेतील जलशुद्धीकरण केंद्र, जलवाहिन्या आणि पाणीटाक्या बांधकामांची कामे तातडीने पूर्ण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. जुन्या प्रकल्पांना पूर्णत्वास न नेता नवे प्रकल्प प्रस्तावित करू नयेत. उभारणी झाल्यानंतर त्याची देखभाल स्थानिक महसुलातूनच व्हावी,असेही ते म्हणाले.

### महापालिकेच्या मुख्यालयासाठी पर्यायी जागा शोधा!

महानगरपालिका मुख्यालयासाठी नवीन पर्यायी जागा शोधण्याचे निर्देश देत त्यांनी शेवटी स्पष्ट केले की, पीएम मित्रा पार्क अंतर्गत उद्योगांना आकर्षित करण्यासाठी एमआयडीसीने जमिनीचे दर कमी करणे आवश्यक आहे. शहरातील छत्री तलाव पर्यटनस्थळ म्हणून आकार घेत असून, नागरिक व पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश त्यांनी दिले. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत शहरातील भूमिगत गटार व्यवस्था केवळ 20 टक्के असल्याने ती तातडीने पूर्ण करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. नेहरू मैदान, श्री अंबादेवी-एकविरादेवी मंदिर परिसरातील विकासकामे राबविताना प्रत्यक्ष पाहणी करून रस्ते, नाले, सांडपाणी व वाहतूक व्यवस्था यांचा संबंधित आराखडा तयार करण्याची सूचना त्यांनी केली. नव्याने विकसित होत असलेल्या हनुमानगढी धार्मिक पर्यटनस्थळासाठी स्थानिक साहित्याचा वापर व्हावा आणि प्रकल्पांना टप्प्याटप्प्याने निधी देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### मोबाइल स्नॅचिंग

**अमरावती :** येथील डेंटल कॉलेजसमोरील मार्गाहून पायदळ जात असलेल्या एका तरुणाचा मोबाइल हिसकावण्यात आला. फ्रेजरपुरा पोलिसांनी गुरुवारी आशीष चोपडे यांच्या तक्रारीवरून जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला. आशीष हे रचनासृष्टी सोसायटीसमोरील रस्त्याने मोबाइलवर बोलत पुढेत जात होते. त्याचवेळी दुचाकीहून आलेल्या तीन मुलांपैकी एकाने त्यांच्याजवळील सात हजार रुपये किमतीचा मोबाइल हिसकावून पळ काढळा.

**शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती**
**विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडार, अमरावती**
**उपाहारगृह चालविण्याचा ठेका देण्याबाबत**

शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथील उपाहारगृह चालविण्याचा ठेका देण्याबाबत इच्छुकांनी दि. 15/12/2025 पासून दि.03/01/2026 या कालावधीत निविदा भरून संस्थेत दि. 03/01/2026 दु.0 5.00 वाजेपर्यंत जमा करावी. निविदा फॉर्म संस्थेच्या संकेत स्थळावर (www.gpamravati.ac.in) व कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

विमाका./अम./जाहि./७९७/२०२५-२६
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती

## सुपर स्पेशलिटीमध्ये भावाचे प्राण वाचवणारी 63 वी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

### मोठ्या भावाने किडनी देवून लहान भावाचे प्राण वाचविले

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती( दि.12 )** - सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे किडनी प्रत्यारोपणाची 63 वी यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. चपराशीपुरा, अमरावती येथील 33 वर्षीय शेख नईम शेख रहमान हे गेल्या दोन वर्षांपासून मूत्रपिंड विकाराने त्रस्त होते आणि नियमित डायलिसिसवर उपचार सुरू होते. दीर्घकाळ डायलिसिस हा स्थायी उपाय नसल्याचे डॉक्टरांनी सांगताच किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला देण्यात आला.

भावाच्या आयुष्याचा विचार करून मोठ्या भावाने 40 वर्षीय शेख नदीम शेख रहमान यांनी नि:स्वार्थी भावनेने स्वत:ची एक किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ही शस्त्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य करण्यात आली. रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. प्रणित काकडे, युरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे यांच्यासह विविध





विभागातील तज्ज्ञ डॉक्टर, बधिरिकरण तज्ञ, परिचारिका, समाजसेवा विभाग, औषध विभाग आणि आरोग्य कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नातून शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. अमरावतीसह विविध जिल्ह्यांतून आणि अन्य राज्यांतूनही या रुग्णालयात विनामूल्य, उच्च दर्जाच्या प्रत्यारोपण शस्त्रक्रियांसाठी रुग्ण येत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

नईम यांना मिळालेली ही नवीन किडनी म्हणजे त्यांच्या आयुष्याला मिळालेले नवे जीवनच असून, भावाच्या परोपकारी निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## घरफोडी करून 1 लाख 77 हजारांचा माल लंपास

**अमरावती** - शिराळा येथे घरातील किचनच्या दाराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत तब्बल 1 लाख 77 हजार 500 रुपयांचा माल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मारवाडीपूरा येथील रहिवासी रमन भागीरथ नावंदर (63, मारवाडीपुरा, शिराळा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून वलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस सुत्रानुसार, रमन भागीरथ नावंदर दाम्पत्य हे 3 डिसेंबर रोजी रात्री 8 वाजता ते 10 डिसेंबर रोजी रात्री 8 वाजेपर्यंत घराला कुलूप लावून फिर्यादी दांपत्य बाहेर गेले होते. 10 डिसेंबर रोजी रात्री ते घरी परतल्यावर त्यांना किचनच्या दाराजवळ कडीङ्कोंडा तुटलेला दिसला. त्यांनी घरात प्रवेश केल्यावर सर्व सामान अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले होते. कपाटे आणि लॉकर जबरदस्तीने तोडून उघडण्यात आले होते.

KVB Karur Vysya Bank
Smart way to bank

करूर वैश्य बँक-अमर आर्चडि
फेज ३, राजपेठ पोलिस स्टेशन समोर,
बडनेरा रोड अमरावती,
महाराष्ट्र, ४४४६०१

**सुरक्षित ठेव लॉकर ब्रेक ओपन सार्वजनिक सूचना**

खालील भाडेकरूंनी अमरावती शाखेतून सेफ डिपॉझिट लॉकरची सुविधा घेतली आहे आणि द करूर वैश्य बँक लिमिटेडने त्यांना वारंवार सूचना जारी करूनही निर्धारित वेळेत ती नूतनीकरण करण्यात अयशस्वी झाले आहेत, भाडेकरूंनी लॉकर भाड्याची देयके भरण्यात अयशस्वी झाल्यामुळे, आम्हाला २२/१२/२०२५ रोजी दुपारी १.00 वाजता संबंधित शाखेच्या आवारात लॉकर उघडण्यास भाग पाडले जात आहे.

ही सार्वजनिक सूचना भाडेकरूंना/लागू असल्यास भाडेकरूंच्या कायदेशीर वारसांना आहे.

पुढे, करूर वैश्य बँक लिमिटेडला कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय ब्रेक ओपनिंगची तारीख बदलण्याचा अधिकार आहे.

| अ.क्र | भाडेकरू नाव | लॉकर क्र | देय रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| 1 | हाजीमोहदसादिक मोहम्मद सुभेदार मन्सुरी | 2129001B012 | 7,080/- |
| 2 | रामेसलाल मोतीलाल कृपलानी | 2129001B004 | 8,850/- |

तारीख: १३.१२.२०२५
ठिकाण: अमरावती
प्राधिकृत अधिकारी
करूर वैश्य बँक लिमिटेड

## राजकीय पक्ष लागले जि. प., पं. स. निवडणुकीच्या तयारीला

### इच्छुक उमेदवारांनी थोपटले दंड; गट, गणात गाठीभेटींवर भर

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट,( दि.12 )** - नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी संपली असली तरी अद्याप निवडणुकीचा निकाल बाकी आहे. या महिन्यात कुठल्याही क्षणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रमुख राजकीय पक्षाच्या इच्छुकांनी गट व गणात दौरे सुरू केले आहेत. शहरानंतर आता ग्रामीण भागात निवडणुकीचे वातावरण निर्माण होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने 31 जानेवारी पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर डिसेंबर महिन्यात नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका पार पडल्या आहेत. नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. यापूर्वीच गट व गणाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे इच्छुक निवडणुकीची तयारी करत आहेत. अनेक महिन्यांपासून प्रमुख राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार गट आणि गणातील गावात जाऊन ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेत आहेत. कार्यकर्त्यांचे नेटवर्क तयार करत आहेत. डिसेंबर महिन्यात निवडणूक लागण्याची शक्यता असल्यामुळे विविध धार्मिक कार्यक्रम विविध स्पर्धा घेऊन इच्छुक उमेदवार गट आणि गणात वातावरण निर्मिती करत आहेत.



### कार्यकर्त्यांच्या बैठकांवर भर

तालुका पातळीवर राजकारण करणाऱ्या दुसऱ्या फळीतील नेत्यांना जिल्हा परिषदेमध्ये संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसाधारण गटात दुसऱ्या फळीतील मातब्बर नेते मंडळी उतरणार आहेत. प्रमुख राजकीय पक्षाकडून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची तयारी म्हणून कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. भाजपाकडून गट आणि गणात इच्छुकांची संख्या मोठी आहे तसेच ग्रामीण भागात महाविकास आघाडी , वंचित बहूजन आघाडीच्या कार्यकर्त्यांची फळी मजबूत असल्यामुळे या पक्षानेदेखील तयारी सुरू केली आहे. दरम्यान, नगरपालिका निवडणुकीत महायुती ,महाविकास आघाडीने स्वतंत्र निवडणूक लढवली होती. आगामी निवडणूकीत महायुती, महाविकास आघाडी जि. प., पं. स. निवडणुकी दिसणार असल्याची चर्चा आहे.

### पालिका निकालाकडे सर्वांचे लक्ष

नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्षासह 25 नगरसेवकांच्या जागेसाठी 2 डिसेंबर रोजी मतदान पार पडले आहे. महाविकास आघाडी आणि भाजपा काट्याची टक्कर झाल्यामुळे निकालाकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत. नगरपालिकेचा निकाल लागल्यानंतर ग्रामीण भागात या निकालाचा परिणाम दिसणार असल्याची चर्चा आहे. तयारीला लागले आहेत.

**ग्रामपंचायत कार्यालय हतरू**
**पंचायत समिती चिखलदरा, जि.अमरावती**
**साहित्य ई-निविदा सुचना क्र./ २०२५-२६**

खालील कामाच्या निविदा प्रक्रिया संगणकावर साहित्य ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करण्यात आली असून वरील कामाची माहिती संपूर्ण अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १३/१२/२०२५ रोजी पासून उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत किंमत | बयाना रक्कम | निविदा फी | वर्ष | योजनेचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हतरू १ येथे अंगणवाडी ईमारत बांधकाम करण्याकरिता साहित्य पुरवठा करणे (ई) | ७,००,०००/- | ७०००/- | ५००/- | | | |
| २ | हतरू ३ येथे अंगणवाडी ईमारत बांधकाम करण्याकरिता साहित्य पुरवठा करणे (ई) | ७,००,०००/- | ७०००/- | ५००/- | | | |
| ३ | हतरू ४ येथे अंगणवाडी ईमारत बांधकाम करण्याकरिता साहित्य पुरवठा करणे (ई) | ७,००,०००/- | ७०००/- | ५००/- | २०२५-२०२६ | आदिवासी उपाय योजना सन २०२५-२६ | साहित्य ई-निविदा |
| ४ | चिलाटी येथे अंगणवाडी ईमारत बांधकाम करण्याकरीता साहित्य पुरवठा करणे (ई) | ७,००,०००/- | ७०००/- | ५००/- | | | |
| ५ | हतरू PHC अंतर्गत माहेरघर दुरुस्ती करणे (बी १) | ७,२०,०००/- | ७२००/- | ५००/- | | | |

**सुचना :-**

१. वरील कामांची ई-निविदा नोंदणीकृत मान्यताप्राप्त साहित्यपुरवठा धारकांकडून सदर कामाची साहित्य ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.
२. निविदा स्विकारणे दि. १३/१२/२०२५ पासून ते १९/१२/२०२५ ला सकाळी १०.०० पर्यंत राहिल.
३. आणखी सविस्तर माहिती ही http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून ती वाचून आपली ई-निविदा ऑनलाईन भरावी.
४. सदर निविदा शक्यतो दि. २१/१२/२०२५ ला उघडयात येईल किंवा दुसऱ्या दिवशी उघडण्यात येईल.
५. निविदे संबंधीचे सर्व अधिकार रद्द करणे अथवा स्विकारणे ग्रामपंचायत ने राखून ठेवलेले आहेत.

सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत हतरू

# : शिवराज पाटील चाकूरकर : ग्रामीण पायातून घडलेले नेतृत्व



देशाच्या राजकारणातील स्वच्छ, अभ्यासू आणि संयमी नेतृत्वासाठी ओळखले जाणारे माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे आज पहाटे दुःखद निधन झाले. वयाच्या ९० व्या वर्षी, शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांची तब्येत ढासळलेली होती. अल्प आजाराने त्यांचे निधन झाल्याची माहिती कुटुंबीयांकडून देण्यात आली. राजकारणातून काही वर्षांपासून ते पूर्णपणे निवृत्त होते. मात्र, त्यांच्या अनुभवी नेतृत्वाची, साधेपणाची आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीची ओळख आजही कायम आहे.

-----------------

लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातून उदयास आलेले शिवराज पाटील चाकूरकर हे नाव आज स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामीण विकास आणि शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमांमुळे चर्चेत आहे. शांत स्वभाव, स्पष्ट बोलणे आणि सातत्याने कामाला प्राधान्य देणारी वृत्ती ही त्यांच्या नेतृत्वशैलीची ओळख मानली जाते.

राजकारणात प्रवेश केलेल्या अनेक नव्या चेहऱ्यांमध्ये शिवराज पाटील चाकूरकर हे व्यक्तिमत्त्व वेगळे ठरते, कारण त्यांनी सत्ता किंवा पदापेक्षा कामाला अधिक महत्त्व दिले आहे. चाकूर तालुक्यातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सातत्याने सहभाग दिसतो आणि त्यामुळे ते एक विश्वासार्ह समाजनेते म्हणून ओळखले जातात.

शिवराज पाटील चाकूरकर हे भारतीय राजकारणातील स्वच्छ, प्रामाणिक आणि अभ्यासू नेत्याचे प्रतीक मानले जातात. राज्यापासून दिल्लीतील सत्ता, केंद्रापर्यंत त्यांनी उच्च पदे भूषवली, पण तरीही त्यांनी कधीही आक्रमक राजकारणाचा अवलंब केला नाही.

**बालपण आणि शिक्षण :**

शिवराज पाटील चाकूरकर यांचा जन्म साध्या शेतकरी कुटुंबात. कुटुंबाची आर्थिक स्थिती मर्यादित असली तरी शिक्षणाबाबत घरात नेहमी सकारात्मक वातावरण होते. लहानपणापासूनच शिस्त, मेहनत आणि प्रामाणिकपणा या मूल्यांचा त्यांच्या स्वभावावर खोलवर परिणाम झाला.

ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनी शिक्षणाची वाटचाल केली, पण शैक्षणिक गुणवत्तेबाबत ते सदैव कटाक्षाने प्रयत्नशील राहिले. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चाकूर तालुक्यातील स्थानिक शाळांमधून पार पडले. महाविद्यालयीन काळात त्यांना सामाजिक कामांची विशेष आवड निर्माण झाली. युवक मंडळे आणि विद्यार्थी संघटनांमध्ये काम करताना नेतृत्वाची ताकद त्यांच्यात विकसित झाली. ग्रामीण भागातील बेरोजगारी, पायाभूत सुविधांची कमतरता आणि शिक्षणात जाणवणाऱ्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या. याच काळात समाजासाठी काहीतरी करायचे हे ध्येय त्यांच्या मनात घट्ट रुजले.

**जन्म आणि शिक्षण :**

त्यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९५३ रोजी लातूर येथे झाला. त्यांनी उस्मानिया विद्यापीठातून विज्ञान शाखेत पदवी तर मुंबई विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण घेतले. आपल्या अभ्यासू वृत्तीमुळे आणि शांत स्वभावामुळे त्यांची ओळख विद्यार्थी दशेपासूनच वेगळी तयार झाली.

**राजकारणाकडे वाटचाल :**

महाविद्यालयीन शिक्षणानंतर शिवराज पाटील चाकूरकर यांनी गाव आणि तालुक्यातील सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली. शेतकरी सल्ला शिबिरे, युवकांसाठी रोजगार मार्गदर्शन यामध्ये त्यांनी नेतृत्व केले. त्यांची कार्यशैली संयमी, प्रभावी आणि परिणामकारक अशी राहिली.

त्यांच्या सामाजिक उपक्रमांमुळे त्यांची ओळख स्थानिक प्रशासन आणि राजकीय वतुर्ळात वाढू लागली. गांवपातळीवरील समस्यांचा अभ्यास करताना त्यांनी जाणीवपूर्वक राजकीय क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला.

राजकारणात प्रवेश हा त्यांच्यासाठी सत्तेचा मार्ग नव्हता, तर समाजकायार्साठी अधिक मोठी व्यासपीठ मिळवण्याचा प्रयत्न होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका घेतली. सार्वजनिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणे, ग्रामसभांमध्ये भाग घेणे, भ्रष्टाचार व निष्क्रियतेवर उघडपणे टीका करणे यामुळे ते लवकरच लोकांमध्ये लोकप्रिय झाले. त्यांच्या संवादकौशल्यामुळे आणि समस्यांवरील सखोल अभ्यासामुळे ते सर्वसामान्यांना सहज पटत गेले.



**नगरपालिकेतून सुरू झालेला प्रवास थेट दिल्लीपर्यंत**

१९६७ ते १९६९ या कालावधीत शिवराज पाटील यांनी लातूर नगरपालिकेमध्ये प्रशासकीय कामे संभाळत राजकारणात पहिले पाऊल ठेवले. स्थानिक प्रश्नांवर काम करतानाच त्यांनी हळूहळू काँग्रेस पक्षात आपला वेगळा ठसा उमटवला.

**दिल्लीतील राजकारणात दमदार प्रवेश**

१९८० मध्ये ते पहिल्यांदा लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले आणि अशा प्रकारे त्यांच्या राष्ट्रीय राजकारणातील प्रवासाची सुरुवात झाली. १९९९ पर्यंत सलग सात वेळा लोकसभेत त्यांनी विजय संपादन करत आपले राजकीय बळ सिद्ध केले.

**केंद्रीय मंत्रिमंडळातील जबाबदाऱ्या :**

इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण राज्यमंत्री, वाणिज्य विभाग, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

**१९९१-१९९६ : लोकसभा अध्यक्ष**

शांत, संयमी आणि नियमप्रिय नेते म्हणून त्यांची ओळख याच काळात अधिक दृढ झाली. लोकसभा अध्यक्षपद भूषवताना त्यांनी अनेक संसदीय रितीरिवाज दृढ केले.

२००४ मध्ये लोकसभेत पराभव झाल्यानंतरही काँग्रेसने त्यांच्या अनुभवाचा सन्मान ठेवत त्यांना राज्यसभेतून केंद्रीय गृहमंत्रीपदाची धुरा सोपवली. २००४ ते २००८ या काळात त्यांनी देशाच्या अंतर्गत सुरक्षेसंदर्भात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेले दहशतवादी हल्ले हा देशाच्या सुरक्षाव्यवस्थेचा काळा दिवस ठरला. या घटनेनंतर त्यांच्या गृहमंत्रिपदावर टीका झाली. जबाबदारी स्वीकारत शिवराज पाटील चाकूरकर यांनी ३० नोव्हेंबर २००८ रोजी स्वेच्छेने राजीनामा दिला. त्यांचा हा निर्णय त्या काळात त्यांच्या नैतिकतेचे आणि जबाबदार नेतृत्वाचे प्रतीक ठरला.

**नेतृत्वशैली :**

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा जमिनीवरचा संपर्क. चाकूर तालुक्यातील प्रत्येक प्रभागात जाऊन प्रत्यक्ष संवाद साधण्याची त्यांची सवय आजही कायम आहे.

त्यांची बैठकशैली अक्राळविक्राळ राजकारण्यांसारखी नसून शांत, विचारपूर्वक आणि चचेर्साठी खुली अशी आहे. प्रश्नांची सखोल जाण, आकडेवारीसह विश्लेषण आणि स्पष्ट भूमिका मांडण्याची क्षमता यामुळे ते स्थानिक प्रशासनालाही पटवून देतात.

त्यांचा मतदारांशी असलेला सहज संवाद हा त्यांच्या लोकप्रियतेचा मुख्य गाभा मानला जातो. लोकांच्या तक्रारी ऐकून घेणे, त्यावर तातडीने पावले उचलणे आणि कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे, हे त्यांच्या दैनंदिन कामात नेहमी दिसते.

**अखंड कार्य, स्वच्छ प्रतिमा आणि अभ्यासू नेतृत्व**

शिवराज पाटील चाकूरकर यांनी कोणत्याही पदावर असताना कायम शांतपणे, अभ्यासपूर्वक आणि कोणत्याही दिखाव्याशिवाय काम केले. त्यांनी कधीही आक्रमक, संघर्षपूर्ण किंवा सनसनाटी राजकारणाचा मार्ग स्वीकारला नाही.

त्यांचा मोजक्या शब्दांत बोलण्याचा आणि तितक्याच प्रभावीपणे मुद्दे मांडण्याचा स्वभाव आजही अनेकांना आदर्श वाटतो.

शिवराज पाटील यांनी गीता आणि कुराणची तुलना करणारे वादग्रस्त विधान केले होते. ते म्हणाले होते की, जिहाद केवळ इस्लाममध्येच नाही, तर भगवद्गीता आणि ख्रिश्चन धर्मातही अस्तित्वात आहे. पाटील म्हणाले की, गीतेत भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला जिहादबद्दल सांगितले.

२०२२ मध्ये, माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किडवाई यांच्या चरित्राच्या प्रकाशनादरम्यान, शिवराज पाटील म्हणाले होते की, केवळ कुराणातच नाही, तर गीतेच्या एका भागात, भगवान श्रीकृष्ण अजुर्नाला जिहादबद्दल सांगतात. हे फक्त कुराण किंवा गीतेतच नाही, तर ख्रिश्चन धर्मातही आहे. ख्रिश्चनांनी असेही लिहिले आहे की ते केवळ शांतता प्रस्थापित करण्यासाठी आलेले नाहीत, तर त्यांच्यासोबत तलवारीही घेऊन आले आहेत.

**: राजकीय प्रवास :**

1967: भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले
1967-1969: लातूर नगरपालिकेचे अध्यक्ष
1971-1972: लातूर नगरपालिकेचे अध्यक्ष
1972-1979: महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य (दोन टर्म)
1974-1975: सार्वजनिक उपक्रम समितीचे अध्यक्ष
1975-1976: कायदा आणि न्यायव्यवस्था, सिंचन, महाराष्ट्राचे राजशिष्टाचार उपमंत्री
1977-1978: महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती
1978-1979: महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष
1980: सातव्या लोकसभेवर निवडून आले
1980 (मे-सप्टेंबर: संसद सदस्यांच्या वेतन आणि भत्त्यांवरील संयुक्त समितीचे सदस्य
1980 (सप्टेंबर-ऑक्टोबर: संसद सदस्यांच्या वेतन व भत्त्यांवरील समितीचे अध्यक्ष
1980-1982: केंद्रीय राज्यमंत्री, संरक्षण
1982-1983: केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)
1983-1984: केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि महासागर विकास राज्यमंत्री
1984: 8 व्या लोकसभेवर पुन्हा निवडून आले (दुसरा कार्यकाळ)
1984-1986: केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान, अवकाश, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, महासागर विकास आणि जैव तंत्रज्ञान राज्यमंत्री
1985: केंद्रीय राज्यमंत्री, कार्मिक आणि प्रशिक्षण, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्तीवेतन आणि प्रशासकीय सुधारणा
1985-1988: केंद्रीय राज्यमंत्री, संरक्षण उत्पादन
1988-1989: केंद्रीय राज्यमंत्री, नागरी विमान वाहतूक आणि पर्यटन (स्वतंत्र प्रभार)
1989: 9 व्या लोकसभेवर पुन्हा निवडून आले (तिसरा कार्यकाळ)
1990-1991: लोकसभेचे उपसभापती
1990-1991: ग्रंथालय समितीचे अध्यक्ष
1990-1991: खासगी समितीचे अध्यक्ष सदस्यांची विधेयके आणि ठराव
1990-1991: सामान्य उद्देश समितीचे सदस्य
1990-1991: व्यवसाय सल्लागार समितीचे सदस्य
1991: 10 व्या लोकसभेवर (चौथा कार्यकाळ) पुन्हा निवडून आले
1991-1996: लोकसभेचे अध्यक्ष
1991-1996: व्यवसाय सल्लागार समितीचे अध्यक्ष
1991-1996: नियम समितीचे अध्यक्ष
1991-1996: सामान्य हेतू समितीचे अध्यक्ष
1991-1996: भारतातील विधिमंडळ संस्थांच्या अध्यक्षपदाच्या अधिका?यांच्या परिषदेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष
1991-1996: भारतीय संसदीय गटाचे अध्यक्ष
1991-1996: आंतर-संसदीय संघाच्या राष्ट्रीय गटाचे अध्यक्ष
1991-1996: राष्ट्रकुल संसदीय संघटनेच्या भारत शाखेचे अध्यक्ष
1996: 11 व्या लोकसभेवर (पाचव्या) पुन्हा निवडून आले.
1996-1998: संरक्षण समितीचे सदस्य
1998: 12व्या लोकसभेसाठी पुन्हा निवडून आले (6वी टर्म)
1998-1999: परराष्ट्र व्यवहार समितीचे सदस्य
1998-1999: नियम समितीचे सदस्य
1998-1999: परराष्ट्र मंत्रालयाच्या सल्लागार समितीचे सदस्य
1999: 13व्या लोकसभेसाठी पुन्हा निवडून आले (7वी टर्म)
1999-2000: वित्त समितीचे अध्यक्ष
1999-2000: विशेषाधिकार समितीचे सदस्य
1999-2000: सामान्य उद्देश समितीचे सदस्य
2000-2004: सल्लागार समितीचे सदस्य
2004: भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार रूपाताई पाटील निलंगेकर यांच्याकडून लोकसभा निवडणुकीत पराभव.

---

## वाचक लिहितात

### इंडिगोचा सावळा गोंधळ

देशातील आघाडीच्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगोने गेल्या एका आठवड्यात देशभरात दोन हजारांहून अधिक फ्लाइट्स रद्द केल्या आहेत, ज्यामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे अचानक रद्द केली आहे. त्यामुळे देशभरातील विमानसेवांवर मोठा परिणाम झाला असून त्याचा हजारो प्रवाशांना फटका बसला आहे.

मुंबईसह दिल्ली, हैदराबाद बंगळुरू आणि अहमदाबाद यांसारख्या मोठ्या विमानतळांवर अनेक प्रवासी अडकून पडल्याचे पाहायला मिळत आहे. काही उशिरा सुटत आहेत.अनेकांना महत्त्वाच्या कार्यक्रमांना जाता आले नाही. प्रवाशांचा संताप वाढत चाललाय. अनपेक्षित आणि एकत्रित आलेल्या अनेक कारणांमुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचे इंडिगोचे म्हणणे आहे.

फ्लाइट ड्यूटी टाइम लिमिटेशनच्या नियमांची अंमलबजावणी झाल्यापासून वैमानिकांसह कर्मचाऱ्यांच्या ड्युटी तासांचे प्रमाण कमी करण्यात आले आहे.

नवीन नियमांनुसार प्रतिदिन ८ तास, आठवड्याला ३५ तास, महिन्याला १२५ तास आणि वर्षाला १,००० तास एवढीच ड्युटी वेळ निश्चित करण्यात आली आहे. दिल्लीत उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर हे नियम लागू करण्यात आले.

कर्मचाऱ्यांच्या कामाचा ताण कमी करण्यासाठी कामांचे तास कमी करणे हा पर्याय योग्य असला, तरी विमान कंपनीच्या विमानांची संख्या, दैनंदिन उड्डाणे आणि सरासरी प्रवासी संख्या या बाबींच्या निकषावर केबिन क्रू आणि वैमानिकांची संख्या पुरेशा प्रमाणात असणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात सेवा नियमित आणि सुरळीत केव्हा होणार, याबाबत अद्यापही शंकाच आहे.

भारताच्या हवाई वाहतुकीत या एअरलाईन्सचा ६५ टक्के वाटा आहे. आज आपल्या देशात पाहिले तर अगदीच बोटावर मोजता येतील इतक्याच विमान कंपन्या आहेत. काही विशिष्ट लोकांकडून जी मोनोपली या देशात होते आहे त्यामुळे अशी परिस्थिती उद्भवली आणि इंडिगोने सरकारला नियम बदलण्यास भाग पाडले.

या एकाधिकारशाहीला काही प्रमाणात सरकारही कारणीभूत आहे. विमान कंपनीची सेवा विस्कळीत झाल्यावर तहान लागल्यानंतर विहीर खोदण्याची सरकारी भूमिका विमान प्रवाशांना नको आहे.

भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत, यासाठी नागरी विमान वाहतूक मंत्रालय आणि विमान कंपन्यांचे प्रशासन यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे.त्यातूनही धडा घेतला नाही, तर पुढील काळात अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.

■ **सौ. वर्षा आवदे नागपूर.**

### व्यसनाधिनतेला खतपाणी!

मुंबईमध्ये शिवडी येथे १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत 'सनबर्न फेस्टिवल' आयोजित करण्यात आला आहे. 'सनबर्न फेस्टिवल' या गोंडस नावाखाली जो मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला जातो तो अत्यंत हीन दर्जाचा असतो. त्यामध्ये घातक अशा अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. युवा पिढीला वाममार्गाला लावण्याचा हा अत्यंत निंदनीय प्रकार राजरोस चालतो.

यापूर्वी गोवा आणि पुणे येथेही हे कार्यक्रम केले गेले त्यावेळीही सुजाण नागरिकांनी त्याला विरोध केला होता.तरुण पिढी म्हणजे राष्ट्राचे आधारस्तंभ असे मानले जाते. तरुण पिढीच जर व्यसनाधीन आणि नशाबाज असेल तर राष्ट्राचा उत्कर्ष कसा होईल? या कार्यक्रमाची दुसरी काळी बाजू म्हणजे आयोजक शासनाचा कोट्यवधी रुपयांचा कर बुडवतात. अशा करबुडव्यांना आणि तरुण पीढीला उध्वस्त करण्याचा कट रचणाऱ्यांना खरेतर कठोर शिक्षा व्हायला हवी ,असेच राष्ट्रप्रेमींना वाटते.

■ **श्रीमती संध्या काटदरे, माणगाव, रायगड.**

### एक आशेचा किरण...

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव दिल्ली येथे १३ ते १५ डिसेंबर २०२५ या काळात होणार असल्याचे वाचनात आले. खरोखरंच आनंद झाला. अतिशय आनंददायी अशा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात सनातन राष्ट्र स्थापनेचा शंखनाद होणार आहे. हा निनाद खरोखरच संपूर्ण वातावरण उल्हसित, चैतन्यमय आणि शुद्ध करेल. दाही दिशात फक्त आनंददायी रामराज्य यावे, प्रत्येक मनुष्यालाच काय, तर प्राणीमात्र आणि निसर्ग यांनाही सुरक्षित वाटावे आणि आनंद वाटावा; घरोघरी पुन्हा संस्कार मनोमन रुजावेत आणि सर्वत्र आनंदी आनंद व्हावा हीच सदिच्छा आहे. सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा समस्त भारतासाठी आशेचा किरणच आहे. याला आमच्या हार्दिक शुभेच्छा!

■ **सौ. आदिती देखणे, नवीन पनवेल.**

---

## संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे ही काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला.

ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा.

दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते.

या संघटनेच्या या कायार्चे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत

म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७६ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा, (क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा.

आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते. त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात.

त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे.

संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

---

## पोळी की ज्वारीची भाकरी, आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर काय ?



पोळी, भाजी, भात , आमटी आणि चटणी किंवा एखादी कोशिंबीरह्व प्रत्येक भारतीय घरातील हा रोजचा ठरलेला मेन्यू असतो. कधीमधी त्यात बदल म्हणून वेगळं काही केलं जातं,

पण बहुतांश लोकांच्या घरी जेवणात हेच पदार्थ बनतात. त्यातही पोळी-भाजी खाल्ल्याशिवाय अनेकांना पोटच भरल्यासारखं वाटत नाही. सारखी पोळी नको म्हणून काही लोकां कधीकधी भाकरीही खातात. तांदळाची, ज्वारीची, नाचणीची, मिक्स पिठांची अशा विविध पद्धतीच्या भाकरीही आपल्याकडे केल्या जातात. प्रत्येक घरानुसार, वेगवेगळ्या पद्धती असतात, पण पोळी किंवा भाकरी आणि भाजी, भात, आमटी हेच मुख्यअन्न असतं.

अनके घरी कित्येक वर्षांपासून गव्हाच्या पिठाच्या पोळ्या किंवा फुलके तयार केले जातात, गरमागरम पोळी, तूप, आणि भाजी खाण्याची मज्जाच वेगळी असते. तर काहीजणं तांदळाची किंवा ज्वारीच्या पिठाची भाकरी खाणं पसंत करतात. त्याचे काही फायदे असल्यामुळे आजकाल ज्वारीची भाकरी खाणं जास्त प्रेफर केलं जातं. पण असं असलं तरी कित्येक वर्षांपासून नियमित खाल्ली जाणारी (गव्हाची) पोळी योग्य की ज्वारीची भाकरी फायदेशीर, असा प्रश्न अनेकांच्या मनात येतोच. तुम्हालाही असा प्रश्न पडतो का, चला मग जाणून घेऊया की पोळी आणि भाकरी यात सर्वात जास्त फायदेशीर काय आहे?

**ज्वारीच्या भाकरीचे फायदे**

**ग्लूटेन-फ्री** : ज्यांना ग्लूटेनची समस्या आहे त्यांच्यासाठी ज्वारीची भाकरीचे चांगली आहे.

फायबरने समृद्ध, बाजरी पचनाच्या समस्या दूर करण्यास मदत करते. ज्वारीच्या भाकरीचे सेवन केल्याने बद्धकोष्ठता देखील दूर होते.

**कमी ग्लायसेमिक इंडेक्स** : मधुमेहाच्या रुग्णांसाठी बाजरीची भाकरी खूप फायदेशीर मानली जाते.

ज्वारीच्या भाकरीमध्ये भरपूर फायबर असते, जे पोट बराच वेळ भरलेले ठेवते, भूक कमी करते आणि वजन कमी करण्यास मदत करते.

ज्वारीच्या भाकरीमध्ये कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम सारखी खनिजे भरपूर असतात.

**(गव्हाच्या) पोळीचे फायदे**

ऊर्जा प्रदान करण्यास उपयुक्त : गव्हाची ब्रेड शरीराला त्वरित ऊर्जा प्रदान करण्याचे काम करते.

प्रोटीन आणि बी व्हिटॅमिनचा उत्कृष्ट स्त्रोत मानली जाते.

पोळी पचायलाही खूप सोपी असते.

**सर्वात जास्त फायदेशीर काय?**

एकंदर पाहता ज्वारीची भाकरी ही बहुतेकदा एकूण आरोग्यासाठी अधिक फायदेशीर मानली जाते, विशेषतः मधुमेही रुग्णांसाठी, वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांसाठी आणि पचनाच्या समस्या असलेल्यांसाठी ती फायदेशीर ठरते.

पण जर तुम्हाला ग्लूटेनची समस्या नसेल आणि तुमच्या दैनंदिन ऊर्जेची गरज जास्त असेल तर गव्हाच्या पिठाची पोळी खाणं देखील चांगलं ठरते. तथापि, आजकाल बहुतेक स्वयंपाकघरात ज्वारीची भाकरीच अधिक प्रमाणात खाल्ली जाते. ■ ■

---

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### नाईट - लाईफचे खरे वास्तव..!

**नाईट लाईफचे असते**
**प्रत्येकाचे मनी अप्रुप**
**म्हणून आंबट शौकीन जाती**
**गोव्याला करून ग्रुप..**

**मनातही असते खुमखुमी**
**ओळखीचे नसते कुणी**
**सुप्तेच्छांना मिळते खत पाणी**
**फक्त नोटांची**
**करावी लागे पेरणी..**

**बाई-बाटली दारूने**
**वातावरण होते टाईट**
**राजाला हवं ते मिळते**
**समजेना कधी**
**संपली नाईट ..**

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार 2025'



## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांची पत्रकार परिषदेत घोषणा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )**– श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार 2025' यंदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर करण्यात आला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ॲड. जे. व्ही. पाटील पूसदेकर, दिलीपबाबू इंगोले, प्रा. सुभाषराव बनसोड, डॉ. वि. गो. ठाकरे, हेमंत काळमेघ, डॉ. अमोल महल्ले, डॉ. चंद्रशेखर देशमूख, डॉ. कुमार बोबडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या भव्य समारंभाला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे महसूल व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, संजय खोडके, प्रताप अडसड, रणधीर सावरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



### कृषी क्षेत्रातील दोन नामांकित पुरस्कारांचेही वितरण

जयंती उत्सवात दोन महत्त्वाचे कृषी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. ज्यामध्ये 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार 2025', 'स्व. शरद जोशी उत्कृष्ट पुरुष शेतकरी पुरस्कार 2025'या पुरस्कारांचा समावेश आहे. दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप रु. 1,11,111 , स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असे आहे. विजेत्यांची घोषणा लवकरच होणार असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले.

### नि:शुल्क कृत्रिम अंगदान शिबिर

इतर उपक्रमामध्ये सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने दि.18 ते 27 डिसेंबर 25 पर्यंत निःशुल्क कृत्रिम अंगारोपण 'जयपूर फुट' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कृत्रिम अंगदानासाठी आतापर्यंत 600 गरजूंनी नोंदणी केली आहे. हे शिबीर अनेकांच्या जीवनात नवी पहाट ठरेल असे मत हेमंत काळमेघ यांनी यावेळी व्यक्त केले आहे. तसेच कु. भक्ती गजानन चौधरी हिला डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार, दि. 25 डिसेंबर रोजी 'आंबा परिषद 2025'कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटित होणार आहे. यावर्षी श्री शिवाजी संस्थेची पहिली शाळा 'श्री शिवाजी हायस्कूल, मेन ब्रँच'शताब्दी वर्ष साजरे करत असून 22 डिसेंबरला महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. 23 ते 25 डिसेंबर दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला तसेच चित्रकला–पुष्प प्रदर्शनीचे आयोजनही करण्यात आले आहे.

### असे राहणार पुरस्काराचे स्वरुप

रु. पाच लाख रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 27 डिसेंबर 2025 रोजी होणाऱ्या शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या 127 व्या जयंती सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस हा सन्मान स्वीकारतील.

### या कार्यासाठी देवेंद्र फडणवीसांना पुरस्कार

- मराठा, ओबीसी व मागासवर्गीय समाजासाठी प्रभावी कल्याणकारी योजना.
- सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध लोकप्रतिनिधी म्हणून सर्वांच्या मनातील आदर
- 'जलयुक्त शिवार'द्वारे लाखो शेतकऱ्यांच्या जमिनी सुपीक करण्याचा उपक्रम.
- समृद्धी महामार्गासारखा क्रांतिकारी पायाभूत विकास.
- देश–विदेशातून गुंतवणुकीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न.
- मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी—लाखो गरीब रुग्णांना दिलासा.
- गरीब विद्यार्थ्यांसाठी परदेशी उच्च शिक्षण योजना.
- गडचिरोलीतील नक्षलवादाला लोकशाही आणि विकासाच्या मार्गाने आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात शासन निर्णयाची अंमलबजावणी ठप्प

## शेतकरी मदतीपासून वंचित

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.12 )** – खरीप हंगाम 2025–26 दरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या सिंचन विहिरी कोसळल्या किंवा पूर्णपणे बुजून गेल्या आहेत. या मोठ्या नुकसानीची दखल घेत राज्य शासनाने मग्रारो–2025 प्र.क्र. 79 मग्रारो–5 अंतर्गत 13 ऑक्टोबर 2025 रोजी विहिरी दुरुस्तीकरिता अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतला होता. शासन निर्णय जाहीर होताच शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज सादर



करून आवश्यक कागदपत्रे जोडली.

तथापि, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर आणि तहसील कार्यालयाकडून या अर्जांवर आजपर्यंत कोणतीही कारवाई न झाल्याचा गंभीर आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. शासनाने स्पष्ट आदेश दिले असूनही स्थानिक प्रशासनाकडून निर्णयाची



अंमलबजावणी होत नसल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. अतिवृष्टीमुळे कोसळलेल्या विहिरींच्या दुरुस्तीअभावी सिंचन व्यवस्था ठप्प झाली आहे आणि शेतीचे नियोजन कोलमडण्याची वेळ आली आहे. या परिस्थितीवर नाराजी व्यक्त करत मोरेश्वर दिवटे यांनी शासनाकडे सविस्तर निवेदन पाठवले आहे. त्यांनी शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी, पात्र लाभार्थ्यांना त्वरित अर्थसहाय्य द्यावे तसेच हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

शेतकरी म्हणत आहेत की, शासनाची मदत त्यांच्या पुनर्बांधणीसाठी अत्यावश्यक आहे; मात्र प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे हक्काची मदत मिळत नाही. परिणामी तालुक्यात शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकरणात शासन कोणती भूमिका घेते आणि वंचित शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत केव्हा मिळते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# नगराध्यक्ष पदासाठी नशीब आजमावित आहे दोन सख्ख्या बहिणी

## नजरा 21 डिसेंबरच्या निर्णयावर

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.12 )** – वरुड आणि शेंदूरजनाघाट—दोन वेगळ्या नगरपरिषद, दोन वेगवेगळे राजकीय झेंडे... आणि त्यांच्या मध्यवर्ती ठरलेल्या दोन सख्ख्या बहिणी—चेतना बेलसरे वरखडे आणि सुवर्णा वरखडे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात नातीगोतींची उदाहरणे अनेकदा ऐकायला मिळतात, मात्र एकाच घरातील दोन बहिणी दोन भिन्न पक्षांच्या प्रतीकावरून नगराध्यक्षपदासाठी उभ्या राहणे ही घटना विरळाच. यंदा मात्र हे चित्र वास्तवात उतरले आहे.



वरुडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या उमेदवार म्हणून चेतना बेलसरे वरखडे मैदानात उतरल्या, तर शेंदूरजनाघाटमध्ये भारतीय जनता पक्षाकडून सुवर्णा वरखडे रिंगणात होत्या. दोन्ही बहिणींनी आपल्या नेतृत्वगुणांवर, कार्यानुभवावर आणि जनतेशी असलेल्या नात्यावर विश्वास ठेवत दमदार लढत दिली. ही लढत केवळ दोन उमेदवारांची नाही; ती दोन विचारधारांची, दोन वेगळ्या विकासदृष्टींची आणि स्थानिक समीकरणांच्या टक्करची आहे. प्रचारादरम्यान दोन्ही बहिणींनी पक्षनिष्ठा जपत स्थानिक प्रश्न, मूलभूत सुविधा आणि विकासाच्या गरजा यांनाच प्राधान्य दिले. त्यामुळे या दोन्ही निवडणुका लोकशाहीतील 'मतदारांसमोर पर्याय उभा करण्याची' मूल्यं अधिक ठळकपणे अधोरेखित करतात. मतदारांच्या दृष्टीने ही लढत विशेष रोचक ठरते कारण दोन्ही उमेदवारांचा स्वभाव, कार्यशैली आणि समाजातील प्रतिमा भिन्न आहेत. त्यामुळे बाजी कोण मारणार? हा प्रश्न परिसरातील चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. एका घरातील दोन बहिणी, पण दोन भिन्न नगरपरिषदांच्या गरजामतदार कोणास प्राधान्य देतात, हे येणारा निकालच ठरवेल. 21 डिसेंबर हा दिवस केवळ निकालाचा नाही; तर लोकशाहीतील एका अनोख्या अध्यायाची नोंद करणारा ठरणार आहे.



## जुन्या घराच्या वादात मारहाण

**अमरावती** – वरूड तालुक्यातील घोराड येथे जुन्या घराच्या वादातून चुलत भावाने केलेल्या मारहाणीत एकाला गंभीर दुखापत झाली असून, त्याच्या पत्नीलाही शिवीगाळ करीत लोटालोट करीत जीवे मारण्याची धमकी दिली. या सर्व प्रकारात फिर्यादी मनीष कडू यांची सोन्याची चेन व मोबाईल गहाळ झाल्याची घटना गुरुवारी घडली. त्यांच्या तक्रारीवरून वरूड पोलिसांनी चंद्रशेख कडू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# बहीरम यात्रा महोत्सवाची तयारी गतीमान

## स्वच्छता, आरोग्य सेवा, माकडांचा बंदोबस्त व पार्किंग व्यवस्थेवर विशेष भर

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर बाजार, ( दि. 12 )**– विदर्भातील प्राचीन आणि ख्यातनाम बहीरम यात्रा महोत्सवाच्या तयारीला यंदा अधिक वेग आला आहे. यात्रेपूर्व आढावा बैठकीत आवश्यक सुविधा, सुरक्षा आणि शिस्तबद्ध व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा झाली. अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर संस्थानच्या सभागृहात झालेल्या या बैठकीत सर्व संबंधित विभागांना काटेकोर नियोजनाचे निर्देश देण्यात आले.

यात्रा 20 डिसेंबर ते 31 जानेवारी 2026 दरम्यान होणार असून भाविकांच्या सोयीसाठी



स्वच्छतेवर विशेष भर दिला जाणार आहे. घंटागाडीची नियमित फेरी, कचरा करणाऱ्या व्यापारी व भाविकांवर दंडात्मक कारवाई, तसेच मंदिर परिसरातील स्वच्छता राखण्यासाठी स्वतंत्र पथक अशी व्यवस्था करण्यात येत आहे. माकडांच्या त्रासावर नियंत्रणासाठी वनविभागाला योग्य उपाययोजना करण्याचे आदेश दिले असून, यात्रेत शंभरहून अधिक दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. आरोग्य केंद्र, पोलीस ठाणे आणि मंदिर संस्थानाचे पथक भाविकांच्या सेवेत सदैव उपलब्ध राहणार आहे. तसेच नियंत्रण कक्षात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसंगावधानाने ठेवण्यात येणार आहेत. गतवर्षी वाढलेल्या गर्दीमुळे मोबाईल नेटवर्क ठप्प झाल्याच्या तक्रारींचा विचार करून सेवा प्रदात्या कंपन्यांना नेटवर्क सुधारण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. रस्त्यांवरील सुरू असलेल्या कामांमुळे पर्यायी दिशादर्शक फलकांची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांवर सोपविण्यात आली आहे.

दरवर्षी वाहन प्रवेशावरून निर्माण होणारे वाद टाळण्यासाठी यंदा हा विषय थेट पोलिसांकडे राहणार आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी व मंदिर विश्वस्त उपस्थित होते.

# प्राथमिक शिक्षकांना टीईटी अनिवार्यतेपासून सूट द्यावी

## चार खासदारांची केंद्रीय शिक्षण मंत्र्याकडे मागणी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )** – राज्यातील प्राथमिक शिक्षकांवरील टीईटी अनिवार्यता सक्तीबाबत पुनर्विचार करण्याची मागणी अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, लातूरचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, वर्ध्याचे खासदार अमर काळे आणि जालना येथील खासदार डॉ. कल्यान काळे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली आहे.उच्च न्यायालयाने 1 सप्टेंबर 2025 रोजी दिलेल्या निर्णयानुसार, सेवेत पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी शिल्लक असलेल्या सर्व शिक्षकांना 1 सप्टेंबर 2027 पर्यंत टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक केले आहे. अपयश आल्यास सेवा समाप्त करण्याचा आदेश असल्याने राज्यातील लाखो शिक्षकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे की 2013 पूर्वी नियुक्त शिक्षकांनी त्या काळातील शैक्षणिक पात्रतेनुसार सेवा स्वीकारली असून, आता टीईटीची सक्ती लादणे हा



स्पष्ट अन्याय आहे. या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये मानसिक, सामाजिक व आर्थिक तणाव वाढत असून कुटुंबांसह विद्यार्थ्यांवरही परिणाम होत असल्याचे संघटनांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक समितीच्या प्रतिनिधींनी चारही खासदारांना निवेदन दिले. त्यानंतर खासदारांनी संसदेत शिक्षणमंत्री प्रधान यांना लेखी निवेदन सादर करून आरटीईच्या कलम 23(2) मध्ये सुधारणा करण्याची व 2013 पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटीमधून सूट देण्याची मागणी केली.

# दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक नेमण्याच्या सूचनेवर प्रश्नचिन्ह

## प्रजासत्ताक दिनासाठी कवायतीच्या सरावाची कसरत



> विद्यार्थ्यांची सुरक्षितता, कवायत संचलनामध्ये एकवाक्यता राहण्यासाठी शिक्षक नियुक्त करणे आवश्यक आहे. दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे उदाहरणादाखल आहे. कवायत संचलनासाठी मोठ्या विद्यार्थ्यांचीही मदत घेता येऊ शकते.
>
> **शरद गोसावी,**
> **प्राथमिक शिक्षण संचालक**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.12 )** – प्रजासत्ताक दिन (26 जानेवारी) निमित्त राज्यातील सर्व शाळांमध्ये सामूहिक कवायत व देशभक्तीपर गीतांवरील संचलनाचा सराव करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र, सरावासाठी दर दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक मार्गदर्शनासाठी नेमण्याच्या सूचनेने शिक्षकवर्गात संभ्रम निर्माण केला आहे.

परिपत्रकानुसार, शाळांनी प्रत्येक शुक्रवारी आणि शनिवारी विद्यार्थ्यांना कवायतीचा सराव करून घ्यावा आणि त्यासाठी शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा शिक्षक, एनसीसीचे विद्यार्थी किंवा इतर शिक्षकांची मदत घ्यावी, असे नमूद आहे. परंतु बहुतेक प्राथमिक शाळांमध्ये संचमान्यतेनुसार उपलब्ध शिक्षकांचे प्रमाण खूपच मर्यादित आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये 60 विद्यार्थ्यांमागे फक्त दोनच शिक्षक तर 20 विद्यार्थ्यांनंतर एक शिक्षक अतिरिक्त अशी मुभा आहे. उच्च प्राथमिक स्तरावर 70 विद्यार्थ्यांपर्यंत दोन शिक्षकांची तरतूद आहे.

क्रीडा शिक्षकाचे पदच नसताना दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक ही अट कशी पाळायची, असा प्रश्न शिक्षक संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी याबाबतची अडचण मांडली.

दरम्यान, दहा विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक ही अट केवळ उदाहरणादाखल असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्यदिनी राबविलेल्या उपक्रमाप्रमाणेच विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, आरोग्य व व्यायामाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी प्रजासत्ताक दिनीही सामूहिक कवायत उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या संयुक्त परिपत्रकात नमूद आहे.

## मार्डी येथे पकडला तडीपार

**अमरावती** – कुऱ्हा पोलिसांनी मार्डी येथून सुरेश आडे या तडीपार आरोपीला अटक केली. तडीपारीचे आदेश डावलून तो गावातच आढळून आला. मंगळवारी रोजी दुपारी ती कारवाई करण्यात आली. कुऱ्हा पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# अपहरण प्रकरणाचा धागा वरुडमध्ये सुटला

## पोलिसांची संयुक्त धडक कारवाई निर्णायक | संत्रा मडी परिसरातून आरोपीला अटक

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.12 )** – दाबका येथील चार वर्षीय चिमुरडीच्या अपहरणप्रकरणानंतर निर्माण झालेली भीती अखेर निवळली आहे. अपहरण करून फरार झालेला आरोपी अनिल जंगलु कुसराम (रा. खडका, जामगांव) याला वरुडमध्ये अटक करण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईमुळे दोन राज्यांच्या पोलिस दलांमधील समन्वयाचे उत्कृष्ट उदाहरण पुन्हा एकदा समोर आले. मंगळवारी वरुड येथील संत्रा मंडी परिसरात आरोपी फिरत असल्याची गुप्त माहिती मिळताच ठाणेदार अर्जुन ठोसरे आणि पोलीस कर्मचारी मनोज टप्पे यांनी



शांतपणे पण अत्यंत तातडीने कारवाई केली. आरोपीच्या हालचालींवर अचूक लक्ष ठेवत अखेर त्याला जेरबंद करण्यात आले. अशा प्रकरणांमध्ये आरोपी निसटण्याची शक्यता मोठी असते; मात्र पथकाने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद ठरली. अपहरित बालिका सुरक्षित सापडणे आणि आरोपीला अटक होणे या दोन्ही गोष्टींमुळे समाजात दिलासा निर्माण झाला आहे. पोलिसांनी दाखवलेली दक्षता, संवेदनशीलता आणि तांत्रिक कौशल्य यामुळे नागरिकांचा विश्वास अधिक घट्ट झाला आहे. अनिल जंगलु कुसराम याला पुढील चौकशीसाठी मुलताई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा उद्देश, पार्श्वभूमी आणि गुन्ह्याचे पडसाद उलगडणे हा पुढील तपासाचा केंद्रबिंदू राहणार आहे. ग्रामीण सुरक्षाव्यवस्थेबाबत इशारा देणारी ही घटना असून, कायद्याच्या जाळ्यातून सुटणे अशक्य असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

RNINO-46975/1985 | Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ | महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# तपोवन वृक्षतोडीला हरित लवादाचा ब्रेक

## एकही झाड १५ जानेवारीपर्यंत तोडता येणार नाही : कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कामाला बंदी

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १२ :

नाशिकच्या तपोवन परिसरातील प्रस्तावित वृक्षतोडीला अखेर मोठा धक्का बसला असून राष्ट्रीय हरित लवादाने १५ जानेवारीपर्यंत तात्पुरती स्थगिती जारी केली आहे.

या ठिकाणी होणाऱ्या वृक्षतोडीविरोधात नागरिकांचा वाढता विरोध, पर्यावरणप्रेमींचे आंदोलन आणि अखेर मनसेने दाखल केलेल्या जनहित याचिकेनंतर आज लवादाने महत्त्वपूर्ण निर्णय देत सर्व प्रकारच्या तोडीवर स्थगिती दिली आहे. यामुळे तपोवनातील हरितपट्टा उद्ध्वस्त होणार की संरक्षित राहणार, याकडे नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

लवादासमोर सुनावणीदरम्यान वृक्षतोडीमागील परवानग्या, उद्देश आणि पर्यावरणीय आघाताशी संबंधित अनेक मुद्द्यांची दखल घेण्यात आली आणि अंतिम निर्णय येईपर्यंत तातडीची स्थगिती देणे आवश्यक असल्याचे हरित लवादाने नमूद केले.

मनसेचे शहर उपाध्यक्ष नितीन पंडित यांनी दाखल केलेल्या याचिकेत तपोवनातील झाडांची होणारी मोठ्या प्रमाणातील तोड थांबवण्याची मागणी करण्यात आली होती.

याचिकेनुसार, या परिसरातील झाडे नाशिकच्या पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यंत महत्त्वाची असून त्यांची तोड झाल्यास संपूर्ण परिसराचा जैवविविधतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. तसेच, वृक्षतोड करून त्या जागी बांधकाम करण्याची शक्यता व्यक्त करत याला ठोस विरोध नोंदवण्यात आला होता. या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेत लवादाने प्रशासनाकडून संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया, परवानग्यांची नोंद आणि वृक्षतोडीमागील प्रत्यक्ष गरज याबाबत सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी सुरू केली आहे.

लवादाच्या आदेशामुळे प्रशासनात अचानक हलचल सुरू झाली आहे. वृक्षतोड थांबवावी लागणार असल्याने संबंधित विभागांनी प्रस्तावित कामकाजावर पुनर्विचार सुरू केला आहे.

विशेष म्हणजे, नाशिकमधील तपोवन परिसर शहराच्या फुफ्फुसांसारखा मानला जातो. अनेक धार्मिक स्थळे, गोदाकाठचा प्रदेश, नैसर्गिक जलस्रोत आणि समृद्ध



वृक्षसंपदा यामुळे हा भाग पर्यावरणीय दृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे येथे होणारी कोणतीही प्रकल्पगत हस्तक्षेप प्रक्रिया अधिक सावधगिरीने हाताळण्याची गरज असल्याचे पर्यावरण तज्ज्ञांचे मत आहे. लवादाच्या आदेशानंतर आता प्रशासनावर संपूर्ण प्रकल्पाची पर्यावरणीय शाश्वततेच्या दृष्टीने नव्याने मांडणी करण्याचा दबाव वाढला आहे.

दरम्यान, याचिका दाखल करणारे मनसेचे नितीन पंडित यांनी न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत केले आहे. तपोवन परिसरातील झाडे तोडली गेली तर नाशिकच्या हवामानावर आणि भविष्यातील शहरी नियोजनावर गंभीर दुष्परिणाम होऊ शकतील, असे त्यांनी सांगितले.

तसेच, प्रशासनाने जनतेचे म्हणणे ऐकून प्रकल्पाचा पुनर्विचार करावा, पयार्यी उपाय शोधावेत आणि हरित पट्ट्यांचे संरक्षण करण्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. स्थानिक नागरिकांमध्येही दिलासा व्यक्त केला जात असून सोशल मीडियावर सेव्ह तपोवन मोहीम पुन्हा जोर धरताना दिसत आहे.

लवादाची अंतरिम स्थगिती मिळाल्याने तपोवनातील झाडांसमोर तातडीचा धोका टळला असला, तरी पुढील सुनावणीत दोन्ही बाजूंचे युक्तिवाद महत्त्वाचे ठरणार आहेत. १५ जानेवारीपर्यंत सर्व संबंधित कागदपत्रांचे परीक्षण, प्रशासनाची बाजू आणि याचिकाकर्त्यांचा पर्यावरणीय आधार असलेला दृष्टिकोन यावर लवाद अंतिम निर्णय घेणार आहे. त्यामुळे पुढील काही आठवडे नाशिककरांसाठी निर्णायक ठरणार असून तपोवनचा हिरवा पट्टा वाचणार की नष्ट होणार? याबाबत उत्सुकता वाढली आहे.

# शिवराज पाटील चाकूरकरांना मान्यवरांची श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

माजी केंद्रीय गृहमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने देशाच्या राजकीय वतुर्ळात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या निधनावर देशभरातून शोकसंदेशांचा वर्षाव होत आहे.

पहाटे अल्पशा आजाराने त्यांची प्राणज्योत मालवल्याची बातमी समोर आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांसारख्या अनेक मान्यवरांनी सोशल मीडियावरून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

राजकारणात स्वच्छ, अभ्यासू आणि संयमी नेता म्हणून ओळख असलेल्या पाटील चाकूरकर यांच्या जाण्याने देशाला अनुभवी नेतृत्वाचा आधार गमवावा लागल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

**राजकारणातील संयमी व स्वच्छ प्रतिमेचा आवाज थांबला**



### समाजकल्याणासाठी त्यांचे योगदान
### पंतप्रधान नरेंद्र मोदी

शिवराज पाटील जी यांच्या निधनाने दुःख झाले आहे. ते एक अनुभवी नेते होते. सार्वजनिक जीवनातील आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी आमदार, खासदार, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे तसेच लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम केले. समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्याच्या ध्येयाने ते झपाटले होते.

गेल्या काही वर्षांत त्यांच्यासोबत माझे अनेक वेळा संवाद झाले, त्यापैकी सर्वात अलीकडील भेट काही महिन्यांपूर्वीच जेव्हा ते माझ्या निवासस्थानी आले होते तेव्हा झाली होती. या दुःखद प्रसंगी माझ्या संवेदना त्यांच्या कुटुंबीयांसोबत आहेत.

### भरून न येणारे नुकसान
### राहुल गांधी

माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील जी यांच्या निधनाची बातमी ऐकून खूप दुःख झाले आहे आणि पक्षाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. सार्वजनिक सेवेतील त्यांचे समर्पण आणि राष्ट्रासाठी त्यांचे योगदान नेहमीच लक्षात राहील. या दुःखाच्या वेळी मी संपूर्ण पाटील कुटुंब, त्यांचे हितचिंतक आणि समर्थकांसह संवेदना व्यक्त करतो.

### मार्गदर्शक नेतृत्वाला आपण मुकलो
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. लोकसभेचे अध्यक्ष, केंद्रात गृह, संरक्षण खात्याचे मंत्री, राज्यपाल अशा विविध भूमिकांमधून काम करताना त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पाडली. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेशी निगडित अनेक अभिनव उपक्रमांना चालना दिली.

तत्वनिष्ठ, अभ्यासपूर्ण आणि ठामपणे मांडणी करणारे नेतृत्व म्हणून त्यांना देशाच्या राजकारणात आदराचे स्थान होते. त्यांच्या निधनामुळे राजकारण-समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला आपण मुकलो आहोत. महाराष्ट्राच्या राजकीय सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे व्यक्तिमत्व म्हणून ते कायम स्मरणात राहतील. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

### राजकारणात मोलाची भूमिका
### शरद पवार

देशाचे माजी गृहमंत्री आणि ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. काँग्रेसची विचारसरणी आणि जनतेच्या समस्या सोडवण्याचा ध्यास यांचा प्रभावी संगम साधत त्यांनी राज्याच्या तसेच देशाच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावली. विविध राजकीय पदांवर कार्यरत असताना त्यांनी केलेले कार्य हे निश्चितच जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देणारे ठरले. ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

### सेवाभावी आदर्श पडद्याआड
### एकनाथ शिंदे

आमदार, खासदार, महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष, लोकसभेचे माजी सभापती, माजी केंद्रीय गृहमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, पंजाबचे माजी राज्यपाल अशा विविध भूमिका समर्थपणे सांभाळत आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिदीर्ला प्रतिष्ठा मिळवून देणारे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या दुःखद निधनामुळे राजकारण व समाजकारण यांची सुयोग्य सांगड घालणारा अनुभवी, सुसंस्कृत व सेवाभावी आदर्श काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. हा आघात सहन करण्याची शक्ती त्यांच्या परिवारास मिळावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना. शिवराज पाटील यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

### अभ्यासू व्यक्तिमत्व
### अजित पवार

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी अध्यक्ष, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनानं देशाच्या राजकारणातील एक सभ्य, सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावलं आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी लोकसेवेचा नवा आदर्श निर्माण केला होता. साधेपणा आणि नैतिक मूल्यांचे ते प्रतीक होते. आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल अशी विविध पदं भूषवत असताना त्यांनी राजकारणातील नैतिकता कायम जपली.


लोकसभा अध्यक्ष म्हणून काम करत असताना लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदेच्या कामकाजाचं थेट प्रक्षेपण, नवीन ग्रंथालय इमारत यासारख्या उपक्रमांना त्यांनी गती दिली. त्यांच्या कारकिर्दीतच उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार सुरू झाले. भारतीय संविधानाचा त्यांचा गाढा अभ्यास होता. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी त्यांनी दिलेलं योगदान कायम स्मरणात राहील.

### संयमी नेतृत्व गमावले
### खा. सुप्रिया सुळे

लोकसभेचे माजी अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर साहेब यांच्या निधनाची बातमी अतिशय दुःखद आहे. त्यांनी तब्बल सात वेळा लातूर लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. यासोबतच केंद्र सरकारमध्ये महत्वाच्या खात्याची जबाबदारी देखील त्यांनी पार पाडली. ते पंजाबचे राज्यपाल आणि चंदीगडचे प्रशासक देखील होते. त्यांच्या निधनामुळे संसदीय कामकाजाचा प्रदिर्घ अनुभव असणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या निधनामुळे त्यांचे पुत्र शैलेश चाकूरकर पाटील, कार्यकर्ते आणि चाकूरकर कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत.

# तेजवानीचे ३०० कोटी गायब?

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :



मुंढव्यातील शासकीय जमिनीत झालेल्या कथित गैरव्यवहार प्रकरणात मुख्य संशयित शीतल तेजवानी हिच्यावर अधिकाधिक गंभीर बाबी उघड होत चालल्या आहेत.

पोलिस तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, तेजवानीने ३०० कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहाराबाबत चुकीची किंवा अपूर्ण माहिती देत पोलिसांची दिशाभूल केल्याचे स्पष्ट झाले आहे. तिच्या नावावर असलेल्या बँक खात्यांची तपासणी केली असता, इतक्या मोठ्या रकमेचे कोणतेही डिजिटल व्यवहार आढळलेले नाहीत. त्यामुळे ही रक्कम रोखीने घेतली का किंवा वेगळ्या मार्गाने व्यवहार केला गेला का, याबाबत पोलिसांना गंभीर शंका निर्माण झाली आहे.

घटनास्थळाशी संबंधित महत्वाची कागदपत्रे तिच्या घरझडतीतून सापडली नाहीत. यामुळे तिची आणखी काही घरे किंवा कार्यालये लपवून ठेवली असल्याची शक्यता पोलिसांनी न्यायालयात मांडली आहे. याशिवाय, जमिनीच्या कब्जा हक्कासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केलेला ११ हजार रुपयांचा डीडी तिने नेमक्या कोणाच्या सांगण्यावरून भरला, याचे उत्तर ती अद्याप टाळत आहे.

आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आलेली शीतल तेजवानी ही मूळची मुंबईतील नरिमन पॉइंटची रहिवासी असून सध्या कोरेगाव पार्क येथील ऑक्सफर्ड हॉलमार्क सोसायटीच्या बी-९०१ मध्ये राहत असल्याचे दस्ताऐवजांवरून स्पष्ट आहे. ३ डिसेंबर रोजी तिची अटक केल्यानंतर गुरुवारी तिची कोठडी संपल्याने तिला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले.

पोलिसांनी न्यायालयाला सांगितले की, तेजवानीचा अमेडिया इंटरप्रायझेस एलएलपी कंपनीशी संपर्क कसा आला, तिने कोणाच्या ओळखीतून हा जमीन व्यवहार साधला, याबाबत ती स्पष्ट माहिती देत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जमिनीच्या गैरव्यवहारातील पैशांचा उगम, त्याची पद्धत, रक्कम कोणाकडून आली आणि ती कुठे वापरली गेली, याबद्दल ती जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहे.

तपास अधिक खोलात गेल्यानंतर पोलिसांच्या हातात दोन महत्त्वपूर्ण दस्तऐवजी पुरावे लागले आहेत. तेजवानीकडून २००६ सालातील ३३ नोंदणीकृत कुलमुखत्यारपत्रे आणि २००८ मधील ४५ रिव्होकेबल कुलमुखत्यारपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

२००६ च्या दस्तऐवजांमध्ये १४४ वारसदारांची नावे आहेत, तर २००८ च्या रेकॉर्डमध्ये २३९ वारसदारांची नावे असल्याचे स्पष्ट झाले आहे. या दोन्हींच्या आधारे तिने २७२ वारसदारांच्या वतीने खरेदी खत केल्याचा दावा केला आहे. तिच्या ताब्यात आलेली कुलमुखत्यारपत्रे अपूर्ण असून, सर्व २७२ वारसदारांकडून प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. उर्वरित कागदपत्रे तिने कुठे दडवून ठेवली आहेत किंवा इतर कोणाकडे लपवली आहेत, हे तपासणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले.

# कुणबी प्रमाणपत्र वितरणात दिरंगाई का?

## सरकार आणि अधिकाऱ्यांना जरांगे पाटील यांची चेतावणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :

हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींच्या आधारे मराठा समाजातील पात्र अर्जदारांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली होती. मुंबईतील विशाल आंदोलनानंतर सरकारने जीआर काढत ही मागणी मान्य केली होती. मात्र, मागणी मंजूर होऊन तीन महिने उलटूनही प्रमाणपत्र वितरणाचा वेग अत्यंत कमी असल्याचे अधिकृत आकडेवारीतून समोर आले आहे.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधून फक्त ५९४ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी केवळ ९८ अर्जांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये अर्जांची संख्या अत्यल्प आहे, तर काही ठिकाणी अर्ज सादर जरी झाले असले तरी मंजुरीच्या बाबतीत प्रशासनाचा वेग अत्यंत संथ असल्याचे दिसून येत आहे. यामुळे समाजात अस्वस्थता वाढत असून मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर आणि प्रशासनावर लक्ष वेधत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.



या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर सवाल उपस्थित केले आहेत. सरकारने प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत कसलाही विलंब करू नये. अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच, प्रशासनाला स्पष्ट आदेश देऊन अर्ज मिळताच त्यावर तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.

जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना थेट संदेश दिला आहे. त्यांनी सांगितले की, सरकारने मराठा समाजासाठी जीआर काढला आहे तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होईल याची जबाबदारीही सरकारनेच घ्यावी. शिंदे समितीला तातडीने आदेश द्या की त्यांनी हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदी वेगाने शोधाव्यात. नोंदी उपलब्ध होताच कुणबी प्रमाणपत्र द्यावे, अशी त्यांची मागणी आहे.

# सीए आकाश मुंदडा यांना पीएच.डी. प्रदान

■ वृत्तसंस्था, जालना, दि. १२ :

जालना येथील चार्टर्ड अकाउंटंट आकाश मुंदडा यांना साबरमती विद्यापीठाच्या पीएचडी डिग्रीने सन्मानित करण्यात आले आहे.



आकाश मुंदडा रिस्क अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट या विषयात प्रबंध (थिसीस) सादर केला होता. यात आपली संपत्ती सात पिढ्यापर्यंत कायदेशीर कशी टिकवता व वाढवता येईल याबद्दल जवळपास २०० पानाचे विवेचन सादर केलेले आहे. हा रिसर्च गुजरात येथील साबरमती विद्यापीठाने मान्य करत आकाश यांना पीएचडी डिग्री प्रदान केली आहे.

आकाश मुंदडा यांनी याआधी एल.एल.बी. आणि सी.ए. डिग्री घेतलेली असून फॉरेन्सिक ऑडिट फ्रोड डिटेक्शन आणि सर्टिफाइड कॉन्करंट ऑडिटर तथा डीसा या पदव्या इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट नई दिल्ली येथून संपादन केलेल्या आहेत. ते जालन्याचे वरिष्ठ सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १२ :

कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी सकाळी अचानक निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीने प्रशासन पूर्णपणे सावध झालं.

१२ डिसेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकृत ई-मेलवर एका अज्ञात व्यक्तीकडून आलेल्या धमकीमुळे कार्यालयात क्षणात खळबळ उडाली. या मेलमध्ये थेट कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती.

त्यामुळे कार्यालयीन कामकाज काही काळ थांबवण्यात आले. मेल पाहताच अधिकाऱ्यांनी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्वरित जिल्हाधिकाऱ्यांना माहिती दिली आणि जिल्हाधिकाऱ्यांनीही क्षणाचाही विलंब न करता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधत तातडीचे निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

धमकीच्या मेलने प्रशासन आणि कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. कारण त्या ई-मेलमध्ये थेट कार्यालयात लावलेले पाच आरडीएक्स बॉम्ब लवकरच फुटतील, असा स्पष्ट उल्लेख होता. अशा प्रकारच्या धमकीला हलक्याने न घेता जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना आणि नागरिकांना तातडीने बाहेर सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. कार्यालय परिसर तात्पुरता रिकामा करण्यात आला आणि प्रवेशबंदी लागू करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांना कार्यालय परिसरापासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले.

घटनेनंतर बॉम्बशोधक आणि नाशक पथक अल्पावधीतच घटनास्थळी पोहोचले. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतील प्रत्येक मजला, प्रत्येक कक्ष आणि संपूर्ण परिसर याची काटेकोर तपासणी सुरू केली. सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या करण्यात येत आहेत. अग्निशामक दलालाही सतर्कतेच्या दृष्टीने बोलावण्यात आले होते.

# मासेमारी व्यवसाय टिकण्यासाठी हवेत केंद्र व राज्य सरकारचे संयुक्त प्रयत्न

दीपक मोहिते
पालघर.

पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यात शेती-बागायती सोबत मासेमारी व्यवसायही मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. समुद्रकिनारी असलेल्या या चार जिल्ह्यात हजारो कुटुंबीय या मासेमारी व्यवसायावर आपला चरितार्थ चालवतात.

समुद्रातील मत्स्य उत्पादनाने कोळी व मांगेला समाजाला बऱ्यापैकी आर्थिक वैभव मिळवून दिले. ४० वर्षांपूर्वी मत्स्यउत्पादन हे माफक दरात विकण्यात येत असे. ते सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला परवडणारे होते. त्याकाळी मच्छिमारांना विपुल प्रमाणात मत्स्यउत्पादन मिळत असे, त्यामुळे ग्राहकांना ते वाजवी दरात विकणे शक्य होत होते.

आज तशी स्थिती उरली नाही, उत्पादनात घट व खर्चात वाढ,त्यामुळे माश्यांचे दर गगनाला पोहोचले आहेत, व ते ग्राहकांना परवडत नाही.उत्पादनात सतत घट का होतेय ? या महत्वाच्या प्रश्नाकडे केंद्र व राज्य सरकारांनी कधीही लक्ष दिले नाही.

समुद्रातील वाढते प्रदूषण रोखण्याकामी कधीही उपाययोजना करण्यासंदर्भात पावले उचलली नाहीत.त्यामुळे हा व्यवसायही शेतीप्रमाणे आज अनिश्चिततेच्या वातावरणात हेलकावे खाऊ लागला आहे.

ज्या व्यवसायाने सरकारला मोठ्याप्रमाणात परकीय चलन मिळवून दिले व आजही देत आहे. त्या व्यवसायाला उभारी देण्याचे काम सरकारने केले नाही. याउलट समुद्रावर मच्छीमारांची असलेली मक्तेदारी मोडून काढण्याचे प्रयत्न त्यांनी सातत्याने केले. समुद्रातील मासेमारी क्षेत्र कमी करण्यासंदर्भात सरकारचा कायम पुढाकार राहिला.

त्यामुळे एकेकाळी ज्यांचा उल्लेख दर्याचा राजा, म्हणून करण्यात येत असे, तो मच्छिमार आज स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपडत आहे. अशी परिस्थिती का निर्माण झाली? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे काम आजवर एकाही सरकारने केले नाही. त्यामुळे मच्छिमार समाज आज सरकारवर नाराज आहे.



ही नाराजी अधून मधून आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत असते, पण सरकार त्याची दखल घेत नाही. मच्छिमाराना समुद्रातून हद्दपार करण्याचा सरकारचा प्रयत्न सुरू झाल्याचा आरोप मच्छीमारांच्या विविध संघटना करत असतात, त्यामध्ये तथ्य आहे, असे आता वाटू लागले आहे. तेलविहिरींची वाढती संख्या, ट्रॉलर्सना मासेमारीसाठी देण्यात येणारे परवाने, समुद्रात सोडण्यात येणारे रासायनिक सांडपाणी, होणारे जलप्रदूषण, परिणामी मत्स्यउत्पादनात सतत होणारी घट व समुद्रकिनारी लादण्यात येणारे निरनिराळे विनाशकारी प्रकल्प इ. कारणामुळे मच्छिमार,सरकारच्या हेतुबद्दल साशंक आहेत.

शेती व बागायती व्यवसायाला सरकारने जसा कृषीचा दर्जा दिला त्याच धर्तीवर समुद्रातील शेती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या व्यवसायालाही कृषीचा दर्जा मिळावा,अशी मच्छिमार समाजाची मागणी होती, ती नुकतीच सरकारने पूर्ण केली.त्यामुळे भविष्यात बया व्यवसायाला थोडी फार उर्जीतावस्था येण्याची शक्यता आहे.

आज मत्स्यउत्पादनातील घसरण, ही दरवाढीला कारणीभूत ठरली आहे. आवक कमी, खर्च परवडत नाही, त्यामुळे मासे चढ्या भावाने विकण्यात येतात व ते सर्वसामान्य ग्राहकांना खरेदी करणे शक्य होत नाही.

नैसर्गिक आपत्ती (वादळ, वादळी हवामान व अतिवृष्टी) व दीड महिन्याचा बंदीचा काळ, या दोन महिन्याच्या काळात मासेमारी बंद असते. अशा परिस्थितीत या मच्छीमाराला अनेक मानवनिर्मित संकटानाही तोंड द्यावे लागत असते. त्यामुळे मच्छिमार आजच्या घडीला मेटाकुटीला आलाय. या व्यवसायाला उर्जितावस्था यावी, यासाठी गेल्या ४० वर्षात प्रयत्नच झाले नाहीत, ही खऱ्या अर्थाने दुर्दैवाची बाब आहे.

केंद्रीय व राज्यस्तरावर मत्स्यव्यवसाय मंत्रालय कार्यरत आहेत, परंतु या दोन्ही मंत्रालयात समन्वयाचा अभाव आहे. केंद्र सरकार,राज्यात एकामागोमाग प्रकल्प लादत आहे, अशा प्रकारचे निर्णय घेताना राज्य सरकारने, त्याचे किती प्रमाणात दुष्परिणाम होतील, अशा प्रकल्पामुळे स्थानिक भूमिपुत्र उध्वस्त होतील, या महत्वाच्या बाबीकडे केंद्राचे लक्ष वेधणे गरजेचे होते, पण राज्य सरकार अशी भूमिका वटवण्याऐवजी केंद्राचीच री ओढत असते.

या व्यवसायावर अवलंबून असलेल्या लाखो कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू रहावा, यासाठी दोन्ही सरकारांनी या व्यवसायाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

समुद्रातील मत्स्यउत्पादनात होणारी घट, यास केंद्र सरकारचे धोरण जबाबदार आहेच, पण बंदीच्या काळात जी मासेमारी करण्यात येते तिही उत्पादनात वाढ होण्यावर विपरीत परिणाम करणारी ठरत असते. बंदीच्या काळातील अशा मासेमारीमुळे माश्याची पिल्ले मारली जातात.त्यामुळे बंदीच्या काळात मासेमारी पूर्णपणे बंदच राहिली पाहिजे.

ग्रामीण भागातील रेतीउत्खनन, वीटभट्टी, शेती बागायती सोबत मासेमारी व्यवसायही टिकून राहिला पाहिजे, यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी सर्वंकष धोरण आखणे गरजेचे आहे. कारण हे व्यवसाय टिकून राहिले तरच माफक प्रमाणात का होईना स्थानिक भूमीपुत्रांच्या हाताला रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

■ ■ ■

## पितृतुल्य मार्गदर्शक हरपला : खा. अशोकराव चव्हाण



लोकसभेचे माजी अध्यक्ष आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने राष्ट्राच्या राजकारणातून एक अनुभवी, संयमी आणि दूरदर्शी नेतृत्व हरपले असल्याचे भावना व्यक्त करत माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अशोकराव चव्हाण यांनी म्हटले की, शिवराज पाटील यांच्या निधनाने माझ्या आयुष्यातील पितृतुल्य मार्गदर्शक मी गमावला आहे. त्यांचा सल्ला, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांचे प्रेम हे माझ्यासाठी कायम प्रेरणादायी होते.

ते म्हणाले की, देशाचे एक व्यासंगी, शिस्तबद्ध आणि कणखर नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेले आहे. राष्ट्रीय राजकारणात ते महाराष्ट्राचा ठळक चेहरा होते. सार्वजनिक प्रश्नांना सदैव प्राधान्य देत त्यांनी आयुष्यभर देशसेवा केली. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी घेतलेल्या दूरदर्शी निर्णयांचा सकारात्मक परिणाम आजही जाणवतो, असे त्यांनी नमूद केले.

अशोकराव चव्हाण यांनी पाटील यांच्या सोबतच्या वैयक्तिक नातेसंबंधाचाही आवर्जून उल्लेख केला. डॉ. शंकरराव चव्हाण आणि शिवराज पाटील यांच्यात जिवलग बंधुत्व होते. या दोन कुटुंबांमध्ये अनेक दशकांपासून आत्मियतेचे, जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत. सार्वजनिक कार्यात त्यांनी मला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन केले, असे ते म्हणाले.

त्यांनी पुढे सांगितले की, देशाच्या प्रशासनात, समाजकारणात आणि संसदीय कामकाजात शिवराज पाटील यांनी दिलेले योगदान चिरंतर आणि स्मरणात राहणारे आहे. त्यांच्या निधनाने राष्ट्राच्या सार्वजनिक आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली असून, ही वैयक्तिक व सार्वजनिक दोन्ही पातळ्यांवरील अपूरणीय हानी असल्याचे त्यांनी नमूद केले. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिव स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना अशोकराव चव्हाण म्हणाले की, त्यांचे आदर्श, त्यांची कार्यनिष्ठा आणि त्यांची मूल्ये सदैव प्रेरणा देत राहतील.

# महाराष्ट्रात मायक्रोसॉफ्टची मोठी गुंतवणूक

## देवेंद्र फडणवीस - सीईओ सत्या नडेला यांची महत्त्वपूर्ण बैठक : ४५ हजार रोजगार मिळणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला यांच्यात आज मुंबईत बैठक झाली. हिवाळी अधिवेशन सोडून मुख्यमंत्री तातडीने मुंबईत पोहोचले. बैठकीत मायक्रोसॉफ्टच्या भारतातील गुंतवणुकीच्या योजना, महाराष्ट्रात होणाऱ्या प्रकल्पांवर चर्चा झाली.

फडणवीस म्हणाले की,मायक्रोसॉफ्टचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा विचार आहे. मायक्रोसॉफ्टसोबत ग्लोबल कॅपेबिलीटी सेंटर हा महत्वकांक्षी प्रकल्प करण्याचा प्रयत्न आहे. नडेला यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधत नेमकी काय चर्चा झाली, याची माहिती दिली.

फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राला एआय हब बनवण्याबाबत मायक्रोसॉफ्ट सकारात्मक आहे. बैठकीत प्राईम एआय ओएसची चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच, इतर क्षेत्रांमध्ये एआयचा



वापर कसा करता येईल, यावरही सविस्तर चर्चा झाली, अशी माहिती त्यांनी दिली. मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला यांनी यावेळी मोठी घोषणा केली. मायक्रोसॉफ्ट भारतात १७.५ अब्ज डॉलरची आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक करणार आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मायक्रोसॉफ्ट महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास सकारात्मक आहे. मायक्रोसॉफ्टसोबत जीसीसी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे.

हा जीसीसी प्रकल्प तब्बल २३ लाख स्क्वेअर फुटांवर महाराष्ट्रात उभारण्यात येईल.या जीसीसीमुळे राज्यात सुमारे ४५ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. याबाबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

## मंत्री सभागृहात येत नसतील तर
# त्यांच्यावर बिबटे सोडा...



मुनगंटीवारांचा पारा चढला
घरकूल निधीवरूनही व्यक्त केला रोष
सभागृह अवाक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१२ :** विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आज भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी रौद्ररूप धारण केलेले पाहायला मिळाले.

मंत्र्यांच्या गैरहजेरीवरून आणि घरकुल योजनेच्या रखडलेल्या निधीवरून मुनगंटीवार यांनी सभागृहात आक्रमक होत स्वतःच्याच सरकारला धारेवर धरले. सभागृहात मंत्री येत नसतील, तर त्यांच्यावर बिबटे सोडा, हे धंदे आता बंद करा, अशा शब्दांत मुनगंटीवार यांनी आपला संताप व्यक्त केला.

विधिमंडळ सभागृहात अर्धा तास चर्चा सत्रात मुनगंटीवार बोलण्यासाठी उभे राहिले असता, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. यावरून त्यांचा पारा चढला. त्यांनी तालिका अध्यक्षांना सुनावले, मंत्री महोदयांना सभागृहात आणण्याची जबाबदारी आमची नाही, ती तुमची आहे. आमदार उपस्थित असताना मंत्री गैरहजर राहतात हे चालणार नाही. मंत्री येत नसतील तर त्यांच्यावर बिबटे सोडा, हे धंदे आता बंद करा, अशी उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**भारत माता माझी आई..**
**डोके ठेवायला जागा नाही..**

चंद्रपूर जिल्ह्यातील 'यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजने'च्या रखडलेल्या निधीवरून मुनगंटीवार अधिकच आक्रमक झाले. भारत माता माझी आई, पण डोकं ठेवायला जागा नाही, अशी गरिबांची अवस्था झाली आहे.

मुंबईत असलेल्यांसाठी सरकारकडे ११ लाख कोटी आहेत, पण आमच्या चंद्रपूरमधील तुटक्या-फुटक्या घरात राहणाऱ्या गरिबांसाठी लागणारे ९६ कोटी ३६ लाख रुपये मिळत नाहीत. ज्या अधिकाऱ्यांमुळे ही परिस्थिती ओढवली आहे, त्यांनी कोरड्या विहिरीत जीव दिला पाहिजे, अशा तिखट शब्दांत त्यांनी प्रशासनाचे वाभाडे काढले.

**बिरबलाची खिचडी शिजेल पण तुमचा निधी येणार नाही**

सरकारच्या कारभारावर टीका करताना मुनगंटीवार यांनी अस्सल म्हणींचा वापर केला. ते म्हणाले, या योजनेचा एक हप्ता मिळाल्यावर दुसऱ्या हप्त्यासाठी गरिबांना चातक पक्ष्यापेक्षा जास्त वाट पाहावी लागते. मंत्री महोदय, कापूसकोंड्याची गोष्ट संपेल, बिरबलाची खिचडी शिजेल, चिऊताई दरवाजा उघडेल, पण तुमचा निधी काही येत नाही. अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली उत्तरे वाचू नका, तर निधी कधी देणार ते स्पष्ट सांगा, असा थेट जाब त्यांनी मंत्री अतुल सावे यांना विचारला.

**मंत्र्यांनी लागलीच मागणी मान्य केली**

दरम्यान, सुधीर मुनगंटीवार यांनी परखड शब्दांमध्ये घरकुल योजनेबाबतची आपली तक्रार मांडल्यानंतर ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी निधी लवकरात लवकर दिला जाईल असं आश्वासन दिलं. पुरवणी मागण्यांमध्ये या योजनेसाठी ३०० कोटी मंजूर झाले आहेत. चंद्रपूरला विहीत १०० टक्के निधी तातडीने दिला जाईल. आपण नवीन घरकुलं पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून देत आहोत. पण आधीच्या घरकुल योजनेसाठी आपण ३०० कोटींची व्यवस्था केली आहे. ताबडतोब त्यावर कार्यवाही होईल, असं ते म्हणाले.

# जातपडताळणीच्या दोन अधिकारी निलंबित

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** बुलढाणा येथील जात पडताळणी विभागाच्या अनागोंदी व मनमानी कारभारावर नागपूर हिवाळी अधिवेशन मध्ये काल गुरुवारी वादळी चर्चा झाली. यावेळी विरोधक आक्रमक झाले. चर्चेअंती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी बुलढाणा जात पडताळणी विभागाच्या तत्कालीन दोन महिला अधिकाऱ्यांना निलंबीत केल्याची घोषणा केली.

विमुक्त जाती व भटक्या जमाती, अनुसूचित जाती व जमातीचे बोगस जात प्रमाणपत्र निर्गमित केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली होती. या चौकशीच्या दोन वर्षांनंतर बुलढाणा येथील जात प्रमाणपत्र पडताळणी विभागाच्या तत्कालीन संशोधन अधिकारी वृषाली शिंदे व सामाजिक न्याय विभागाच्या तत्कालीन सहआयुक्त तथा संशोधन अधिकारी अनिता राठोड यांना निलंबित करण्यात आले आहे.

गुरुवारी हिवाळी अधिवेशनादरम्यान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय सिरसाठ यांनी सभागृहात निलंबनाची ही घोषणा केली.

या महिला अधिकाऱ्यांनी राजपूत भामटा, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि अनुसूचित जाती व जमातीचे बोगस जात प्रमाणपत्र मोठ्या संख्येने निर्गमित केली होती.अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे विदर्भ उपाध्यक्ष तथा आरक्षण बचाव संघर्ष समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, राजेश नाईक राजेश फकिरा राठोड यांनी याची शासनाकडे तक्रार केली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने वारे कमिटीची स्थापना करून चौकशीचे आदेश दिले होते. दरम्यान, वारे कमिटीने चौकशी करून ६ मे २०२३ रोजी अहवाल सादर केला होता. या अहवालात तब्बल जात वैधता प्रमाणपत्राच्या ५६८ प्रकरणांपैकी ५० जात वैधता प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यात ४७ जात वैधता प्रमाणपत्रे अवैध आढळली.

या गंभीर प्रकरणाविषयी राठोड यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ यांच्याकडे तक्रार केली. बोगस जात प्रमाणपत्र घेणारे तसेच निर्गमित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्याअन्वये सामाजिक न्यायमंत्री शिरसाठ यांनी अखेर ही कारवाई केली.

# राणांना चार बिबट पाळायला द्या



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** हिवाळी अधिवेशन पहिल्या दिवशीपासून बिबट विषयावर तापले आहे. त्यातच आमदार रवी राणा यांनी बिबटला पाळीव प्राणी घोषित करण्याची मागणी केली आहे. त्यावर उत्तर देतांना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी रवी राणा यांना ४ बिबट तर सत्ताधारी आमदारांना प्रत्येकी २ आमदार पाळण्यासाठी देण्याचा टोला लगावला.विधान भवन परिसरात वडेट्टीवार म्हणाले, चोर, दरोडेखोर, डाकू, जमीन घोटाळेबाज यांना जमा करून सरकार चालविले जात आहे.

सत्ताधाऱ्यांनी महायुती जरूर करावी आणि बॅलेटवर निवडणूक घ्यावी. जनता त्यांना जागा दाखवून देईल.ह्व ह्यघुग्गुस नगरपालिकेचा कुठलाही विषय हायकोर्टात नव्हता. तेथील निवडणूक आम्ही जिंकणार होतो. त्यामुळे तिथल्या आमदारांच्या दबावापोटी निवडणूक आयोगाने निवडणूक थांबवली. अशा निवडणुका लांबणीवर टाकण्याचे पाप सरकारने केले आहे.

जनतेचा कौल महायुतीच्या विरोधात जाणारा आहे. त्यामुळेच निवडणुकांचे निकाल लांबविण्यात आले आहेत. निवडणुकीपूर्वीच बावनकुळे २६८ पैकी १७५ जागा जिंकणार, असे सांगतात. याला कुठला आधार आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, ईव्हीएममध्ये घोळ करून निवडणूक जिंकण्यात येत आहे.

रवी राणांच्या घरी चार-पाच बिबट्या पाळायला दिले पाहिजे. त्यांच्या अनुभवावरून प्रत्येक आमदाराला दोन बिबट्या दत्तक द्यायला हवे. पडळकर आणि आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमधील मुंबईत झालेल्या राड्यावर ते म्हणाले,सत्ताधारी असो की विरोधक असो त्याच्यावर फौजदारी कारवाई व्हायला हवी. कुणालाही सोडू नये.



■ **नागपूर :** *येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान राज्यभरातील विविध संघटना त्यांच्या मागण्यांसाठी विधीमंडळावर मोर्चे काढतात. अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी एनएनयुआय संघटनेच्यावतिने विधानभवनावर धडक देण्याचा प्रयत्न केला. तथापि, एलआयसी चौकात पोलिसांनी त्यांचा मोर्चा अडवून धरला. यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी बॅरीकेटसूवर चढून पुढे घुसण्याचा प्रयत्न केला.*

# माजी मंत्री नितीन राऊतांना कोण देतो धमकी? लेटरहेडचा गैरवापर झाल्याची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १२ :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री नितीन राऊत यांनी शुक्रवारी एका तरुणाने आपल्याला आपल्या कार्यालयात शिरून धमकी दिल्याची बाब विधानसभेच्या निदर्शनास आणून दिली.

माझ्या लेटरहेडचा गैरवापर करून पास काढण्यात आली. आज चक्क एक एक लांब केसांचा तरुण माज्या घरातील कार्यालयात शिरला. त्याने आरडाओरडा करत आम्हाला धमकावले. यामुळे माज्या व माझ्या कुटुंबीयांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले. या माहितीनंतर अध्यक्षांनी योग्य ती कारवाई करण्याची ग्वाही दिली.



नितीन राऊत हे काँग्रेसचे उत्तर नागपूरचे आमदार आहेत. त्यांनी शुक्रवारी विधानसभेच्या अध्यक्षांकडे एका गंभीर प्रकरणाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, एक तरुण आज सकाळी दुचाकीवरून माझ्या कार्यालयालगत आला. तो कुठे आहे त्याला फोन करा असे म्हणत त्याने आरडाओरडा सुरू केला. तो कार्यालयात शिरला. कार्यालयात बौद्ध भिक्षू बसले होते. या प्रकारामुळे ते घाबरले. मी पोलिसांना बोलावले. अशा घटना घडल्यास माज्या व आमदारांच्या सुरक्षेचे काय होईल?

नितीन राऊत म्हणाले, सदर तरुणाने माझा मुलगा कुणाल याच्याविषयीही विचारणा केली. धमकी दिली. मी आजपर्यंत कोणतीही सरकारी सुरक्षा वापरली नाही. पण आता अशा धमक्या दिल्या जात आहेत. आमदारांना अशा धमक्या मिळत असतील तर संपूर्ण महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था राखली जात आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## छत्रपतींचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करा



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१२ :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार अमोल मिटकरी यांनी आज विधानपरिषदेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाचा सीबीएसईच्या अभ्यासक्रमात समावेश करण्याची मागणी केली.

ते म्हणाले, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा सीबीएसईच्या अभ्यासक्रमात समावेश करावा. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा पाठ्यपुस्तकांत समावेश करताना अस्सल चरित्र-साधन निर्मितीवरील खंड अभ्यासक्रमात असावेत.

## राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये
# आकृतीबंधानुसार पदभरती करणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.१२ :** राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये आकृतीबंधानुसार पदभरती करणार असून वित्त विभागाकडे पाठपुरावा करून लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य सतिश चव्हाण यांनी कृषी विद्यापीठांमध्ये मनुष्यबळाविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल बोलत होते. यावेळी सदस्य अमोल मिटकरी आणि सदाभाऊ खोत यांनी चर्चेत सहभाग घेतला. सेवाप्रवेश मंडळाचा तात्पुरता कार्यभार उपाध्यक्ष (एमसीआरसी) यांना तत्काळ सोपविण्यात येणार आहे, ज्यामुळे प्रमोशन विषयक प्रक्रिया अधिक वेगाने नियंत्रित होईल.

## महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही?

**नाना पटोलेंचा सवाल**



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** ज्येष्ठ सदस्य आणि माजी मंत्री नितीन राऊत यांना धमक्या देण्यात आल्या. तसेच सत्ता पक्षाच्या आमदारांनी त्यांना धमक्या मिळाल्या आहेत असे सांगितले. नागपूरमधील दोन्ही आमदारांना अशा प्रकारे धमक्या मिळत असतील, तर महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही, असा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

गुंडशाही ज्या प्रकारे वाढत आहे, ती नेमकी कुणाच्या आशीवार्दाने चालते आहे आणि एवढी हिंमत कशी होते, हे तपासले पाहिजे. मुख्यमंत्री आणि गृहराज्यमंत्री यांनी तात्काळ या घटनेची संपूर्ण माहिती घेत सदनाला आणि राज्याला ही माहिती द्यावी, असे नाना पटोले यांनी सांगितले आहे.

# मराठी बोलीभाषांचा जागर.. नागपूर, मुंबईसह राज्यभर!

कोणत्याही गोष्टीची सुरुवात करणे अवघड नसते. मात्र सातत्याने वर्षानुवर्षे ती गोष्ट करीत राहणे आणि त्या गोष्टीत सातत्य राखणे महाकठीण काम असते. अशा काही गोष्टी जेव्हा एका पिढीकडून दुसरी पिढी स्वीकारते आणि त्यांचा वसा आणि वारसा जतन करते तेव्हा निश्चितच ही गोष्ट कौतुकास्पद, अभिमानाची आणि अभिनंदनीय ठरते.

स्व. ले. गंगाराम गव्हाणकर यांनी मराठीच्या बोलीभाषा मधून एकांकिका स्पर्धेची संकल्पना मांडली. सुप्रिया प्रोडक्शनच्या स्व. गोविंद चव्हाण यांनी ती उचलून धरली. त्या गोष्टीला आज नऊ वर्षे उलटून गेली आहेत. बोलीभाषा एकांकिकेचे संकल्पक आणि मुहूर्तमेढ रोवणारे दोघेही काळाच्या पडद्याआड गेले तरी आपल्या दिवंगत आदर्शांचा वडिलांचा वसा, वारसा आणि विचार नेटाने पुढे घेऊन जाण्याचे काम स्व. गोविंद चव्हाण यांची मुलगी सुप्रिया चव्हाण ही अत्यंत धडाडीने करीत आहे. ही गोष्ट खूपच प्रॉमिसिंग वाटते.

मराठीच्या बोलीभाषा अनेक आहेत. घाटी, कोकणी, मालवणी,



**नोंदणीची अंतिम तारीख : १५ डिसेंबर २०२५**
बोलीभाषा एकांकिका स्पर्धा : २०२६, वर्ष ९ वे
प्राथमिक फेरी : मुंबई (१९-२० डिसेंबर)
आणि नागपूर. (२७ डिसेंबर)
अंतिम फेरी : मुंबई (१२ जानेवारी २०२६)
अधिक माहितीसाठी भेट द्याः www.supriyaproduction.com
Boli Bhasha टॅब
संपर्क (whatsapp) : 9930466924

नगरी जुन्नरी, वऱ्हाडी, संगमेश्वरी, खानदेशी अहिराणी, तावडी, पुणेरी, सामवेदी कुपारी या बोली भाषांसह जवळपास ३६ वेगवेगळ्या मराठीच्या बोलीभाषांमध्ये गेल्या आठ वर्षात विविध नव्याकोऱ्या एकांकिकांचे प्रयोग मराठी बोलीभाषा एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून झालेले आहेत.

ही स्पर्धा नवोदित अभिनेता, अभिनेत्री, लेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाश योजनाकार यांच्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ आहे असं म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही.

या स्पर्धेत यश मिळवणाऱ्यांसाठी प्रथम तीन सांघिक विजेत्यांना अनुक्रमे २१ हजार, १५ हजार व १० हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश, पार्श्वसंगीत, रंगभूषा, वेशभूषा, विनोदी लेखन, विनोदी अभिनय, उत्तम व्यवस्थापन अशी विविध पारितोषिके नाट्यक्षेत्रातील दिग्गजांच्या स्मरणार्थ देण्यात येणार आहेत. पूर्णपणे मराठीतील प्रादेशिक बोलीभाषांवर आधारित अशी ही एकांकिका स्पर्धा आहे.

■ **गजानन तुपे**
**निवासी संपादक, मुंबई.**
Gajanantupe2@gmail.com

## हिवाळी अधिवेशानाचे सत्ताधाऱ्यांना गांभीर्य नाही

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १२ :** नागपूरचे हिवाळी अधिवेशन अवघे एक आठवड्याचे घेऊन भाजपा महायुती सरकारने विदर्भ कराराचा अनादरच केला आहे. शेतकरी, कामगार, बेरोजगार, कायदा सुव्यवस्था, भ्रष्टाचार महिला सुरक्षा यासारखे असंख्य प्रश्न असताना अधिवेशनात त्यावर चर्चा होत नाही आणि कुठे कुत्री पकडा, बिबटे सोडा यावर चर्चा होत आहे. सत्ताधारी पक्षाला अधिवेशनाचे काही गांभिर्यच राहिलेले नाही, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



नागपूर विधान भवनात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भाजपा महायुती सरकारच्या काळात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दररोज भ्रष्टाचाराची एक एक प्रकरणे उघड होत आहेत. पैशांचा सुळसुळाट सुरु आहे. भ्रष्टाचार हेच सरकारचे ब्रिद वाक्य आहे. न खाऊंगा, न खाने दुंगा, पासून झालेली सुरुवात आता मिल बाट के खायेंगे पर्यंत आल्याची टीका त्यांनी केली.

# अंडरग्राउंड विद्युत वायरिंगची तातडीची गरज!
## हिवाळी अधिवेशनात निधीची तरतूद व्हावी : जनतेची मागणी

■ **पुरूषोत्तम ढोले, अकोला, दि. १२ :** जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळा संपताच आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी महावितरणकडून मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केली जाते. वारा, पाऊस आणि विजेच्या तारा यांचे अपघात टाळण्यासाठी ही तोड केली जाते असा अधिकृत दावा असला, तरी प्रत्यक्षात यामुळे जिल्ह्याचे पर्यावरणीय संतुलन गंभीरपणे बिघडत आहे.

अनेक दशकांपासून नुकसान होत असलेल्या या हिरवळीला पर्याय उपलब्ध असतानाही शासन आणि वीज यंत्रणा याबाबत गभीर दिसत नाहीत, ही चिंतेची बाब आहे.

जिल्ह्यातील नागरिक आणि विविध सामाजिक संस्थांनी अनेक वेळा महावितरण प्रशासनाला याबाबत निवेदने दिली. परंतु वृक्षतोड कमी करण्याचा कोणताही ठोस पर्यायी मार्ग स्वीकारण्यात आलेला नाही. यामुळे, निर्भय बनो जनआंदोलन व अकोला जिल्ह्यातील जागरूक नागरिकांनी जिल्ह्यात अंडरग्राउंड विद्युत वायरिंगसाठी शासनाने निधीची स्वतंत्र तरतूद करावी, अशी प्रमुख मागणी पुढे केली आहे.

**वृक्षतोड आणि पर्यावरणीय धोका**

दरवर्षी हजारो झाडे महावितरणच्या दाव्याखाली तोडली जातात. परिणामी, पक्षी व प्राणी यांचे अधिवास नष्ट होतात .उन्हाळ्यात तापमान आणखी चढते. भूजल पातळी घटते प्रदूषण वाढते परिसरातील तापमान-वर्षाव चक्रात विकृती येते.

पर्यावरणातील ही हानी सर्वसामान्य नागरिकांना थेट जाणवू लागली आहे. तज्ज्ञांच्या मते अंडरग्राउंड विद्युत वायरिंगचे अनेक फायदे आहेत. झाडे तोडण्याची आवश्यकता जवळपास पूर्णपणे समाप्त होवून, वादळ, पाऊस, वाऱ्यामुळे होणारे अपघात व तांत्रिक बिघाड कमी होतो. शिवाय, देखभाल खर्च दीर्घकालीन कमी होवून, विद्युत पुरवठ्यातील खंड कमी पडतो.

पावसाळ्यात विद्युत दुरुस्ती करीत असताना अनेक लाईनमनचे जीव धोक्यात असून अनेकांना आपला जीव गमावावा लागतो. अकोला हे कृषीप्रधान, औद्योगिक शक्यता असलेले आणि झपाट्याने वाढणारे शहर आहे. अशा जिल्ह्याला आधुनिक व सुरक्षित वीजपुरवठा यंत्रणा मिळणे आवश्यकच आहे. हिवाळी अधिवेशनात अंडरग्राउंड विद्युत लाइनसाठी स्वतंत्र निधीची तरतूद व्हावी, ही जिल्ह्याची मागणी आता तीव्र झाली आहे.

निर्भय बनो आंदोलनच्या माध्यमातून नागरिकांनी शासनाला स्पष्ट संदेश दिला आहे की, वृक्षतोड थांबवा, अंडरग्राउंड वायरिंगला मंजुरी द्या, पर्यावरण वाचवा. सरकारने मागील काही अधिवेशनांत विविध जिल्ह्यांसाठी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठे निर्णय घेतले आहेत. अकोला जिल्हा वारंवार मागे पडत असल्याची भावना जनतेत आहे. अकोला जिल्ह्यातील जनप्रतिनिधी झोपेचे सोंग घेऊन या सर्व गोष्टी डोळे झाक करत आहे. त्यामुळे या वेळेस तरी अकोल्याला न्याय देणे ही काळाची गरज आहे.

अकोला जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटना एकमुखाने याच मागणीवर ठाम आहेत. शासनाने आता केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृती करावी, ही जनतेची ठाम भूमिका आहे.अकोला जिल्ह्याच्या भविष्यासाठी हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. हिवाळी अधिवेशनात जर अंडरग्राउंड विद्युत वायरिंगसाठी तरतूद झाली, तर हजारो झाडे वाचतील, पर्यावरण सुधारेल आणि सुरक्षित व स्थिर वीजपुरवठा उपलब्ध होईल.

हिरवे अकोला वाचवायचे असेल तर अंडरग्राउंड विद्युत वायरिंग हाच एकमेव मार्ग असून, शासनाने तात्काळ निधी द्यावा, अशी मागणी अकोला जिल्ह्यातील जनतेच्या वतीने निर्भय बनो जन आंदोलनाच्यावतीने ही शासनाकडे करण्यात आली आहे. दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.